## प्रकरण १
## इतिहास आणि इतिहासाची साधने

### अ) इतिहासाच्या व्याख्याः स्वरुप आणि व्याप्ती

आजचा वर्तमानकाळ हा काही अचानक उदभवलेला नाही तो कालच्या भुतकाळातून परिणत होत आला आहे. वर्तमानकाळ हा एवढा निसटता आहे की, तो चिमटीतही पकडता येत नाही. म्हणूनच असे म्हटले जाते की, वर्तमानकाळातील कोणतीही गोष्ट आपल्या हाती येत नाही. आपल्या हाती उरतो तो केवळ भुतकाळ आणि इतिहास म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर भुतकाळ येतो. इतिहासात भुतकाळात घडलेल्या घटना, त्याचा पुरावा किंवा निवेदन आपल्याला बघावयास मिळते. माणसाला पुर्वी काय घडले आहे याची उत्सुकता असते तर पुढे काय घडणार आहे याची जिज्ञासा असतं. म्हणूनच रोमन सिनेटर सिसेरोचे विधान **'ज्या व्यक्तीला त्याच्या जन्मापुर्वी घडलेल्या घटनांचे ज्ञान नाही, त्याची बाल्यावस्था अद्याप संपलेली नाही असेच आपणास म्हणावे लागेल.'** अशा आशयाचे असून मोठे अर्थपूर्ण वाटते.

'इतिहास' या शब्दाचा अर्थ हा विविध प्रकारे वापरला जातो. एक अर्थ म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांची जंत्री किंवा पुर्वी घडून गेलेल्या घटना. थोडक्यात इतिहास म्हणजे मानवी जिवनात पुर्वी घडून गेलेल्या ज्या गोष्टी आहेत किंवा घटना आहेत. त्यांचा अभ्यास इतिहासाच्या कक्षेत येतो. थोडक्यात इति हा आस म्हणजे असे असे घडले असा त्याचा शब्दशः अर्थ होतो. इतिहासात मावनी व्यवहार यांचा विचार प्रथमतः येतो. केवळ वृत्तांत मांडणे म्हणजे इतिहास नाही.

एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका मध्ये इतिहास या संज्ञेचा उपयोग दोन प्रकारांनी केला आहे. घटनांची जंत्री किंवा खुद्द घटना अशा अर्थाने या शब्दाचा अर्थ लावला आहे. ब्रिटानिका जरी असे म्हणत असला तरी फक्त घटना म्हणजे इतिहास होत नाही तर घटनांना निश्चित अर्थ देण्याचे कार्य इतिहासकार करीत असतो आणि त्या अर्थातून त्याला इतिहासाचे स्वरुप प्राप्त होते. म्हणून अमेरीकन इतिहासकार हेन्री स्टील कॉमेंजर म्हणतो, इतिहास म्हणजे केवळ भूतकाळ आणि भुतकाळात घडलेल्या घटना नव्हेत तर दप्तरातील नोंदींचा जेव्हा अर्थ लावला जातो त्या प्रक्रियेला इतिहास असे म्हणतात. भुतकाळातील घटना आणि दप्तरातील नोंदीच इतिहासलेखनास पुरेशा नसतात. किंबहुना त्यातून इतिहास समोर येईलच असे नाही तर त्या घटना आणि नोंदींचा अन्वयार्थ लावून त्या घटनांची कारण परंपरा प्रस्तुत करणे इतिहासकाराचे कर्तव्य असते तेव्हा निश्चित असा इतिहास समोर येण्यास मदत होते. जॅकोब बर्कहार्ट यांच्यामते "पुढच्या युगातील लोकांना मागील युगातील लोकांनी केलेल्या उल्लेखनिय घटनांचा अनुभव देणे होय." अशा प्रकारच्या घटनांचा अन्वयार्थ लावून इतिहासकार गतकाळाला सजीव करण्याचे कार्य करीत असतो. ग्रिकांनी सर्वप्रथम इतिहासलेखनाला सुरुवात केल्यानंतर डायोनिसस, हिरोडोट्स, थ्यूसीडायडीज याने इतिहास विषयक जे विचार मांडले त्यावरुन आपणास असे दिसते कि, प्रत्यक्ष घटना, मनोरंजक घटना सांगण्याकडे या इतिहासकारांचा कल होता. ॲरीस्टॉटल प्रख्यात ग्रिक तत्ववेत्याने इतिहास म्हणजे न बदलणाऱ्या भुतकाळाची कथा आहे. असे मत मांडले आहे. म्हणजेच इतिहास हा विषय कधीही बदलत नसतो. जे भुतकाळात घडले ते पुराव्यांनिशी जसेच्या तसे सांगणे म्हणजे इतिहास असा अर्थ त्यांना इतिहासाचा अभिप्रेत होता. तर घडून गेलेल्या घटना पुढील पिढ्यांकरीता जतन करुन ठेवणे हा इतिहासकाराचा हेतू असावा असे मत हिरोडोटस् ग्रिक इतिहासकार मांडतांना दिसतो.

ग्रिकांच्या इतिहासलेखनानंतर रोमन इतिहासकारांनी इतिहासलेखन केले. ग्रिक इतिहासकार ज्या प्रमाणे स्वतःहास श्रेष्ठ समजत होते त्याप्रमाणे रोमनांना स्वतःचा अहगंड नव्हता. टॅसीटस लिव्हि, नेनियस, पिक्टर, पासियस काटो यांचे इतिहाविषयक दृष्टी मात्र रोमनांशी मिळती जुळती दिसून येते. लिव्हि याने इतिहासाने राष्ट्रभक्तीचा विकास झाला पाहिजे असे मत मांडले.

ग्रिक आणि रोमनांनंतर परमेश्वरी दृष्टीकानातून इतिहासलेखनाला सुरुवात झाली. ख्रिश्चन आणि अंरब इतिहासकारांनी जे इतिहासलेखन केले ते नियतीवादाकडे झुकलेले होते

१८ व्या शतकात युरोपात प्रबोधन घडून येण्यास सुरुवात झाली. त्यावेळी सुप्रसिद्ध इंग्रज विद्वान आणि प्रबोधनाचा आग्रदुत असलेल्या फ्रान्सिस बेकनने 'माणसाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे. 'बेकननंतर हेन्री जॉनसनने ज्या घटनांचा मानवी मनावर खोल ठसा उमटतो त्याला इतिहास असे म्हणतात. अशी व्याख्या केली आहे. मात्र चार्लस् फर्थ या विद्वानाने इतिहासाची व्याख्या करणे हे सुलभकार्य नाही. *History is not easy to* असे मत मांडले आहे. प्रो. लेकीने (*History is the record for Moral Values)* इतिहास म्हणजे एक नैतिक प्रकारचा सग्रह आहे. लेकीच्या माते मानवी जीवनात ज्या वेगवेगळ्या घटना घडतात, त्याच्या मागे नैतिक मुल्ये असतात. या नैतिक मुल्यांची जपणूक करण्यासाठी आणि ते सुरक्षितपणे टिकवून ठेवण्यासाठी काही वेळा संघर्षही केले जातात व काही वेळा माघारही घ्यावी लागते. असे असले तरी लेकीने केलेली व्याख्या परिपर्ण ठरत नाही.

अनेक विद्वानांनी इतिहासाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला.

१) प्रो. ओकेशॉट :- इतिहासकार लिखाण करीत असतो. त्याचं लिखाण तथ्यावर अधारलेले असते, इतिहासकाराची कृती,

नोंद, मांडणी अर्थात इतिहास हा इतिहासकाराचा अनुभव असतो.

२) हेन्री जॉन्सनः- जे घडले ते जसेच्या तसे सांगणे म्हणजे इतिहास होय.

३) प्रो. लेकी:- नैतिक कल्पनांचा संग्रह म्हणजे इतिहास होय.

४) हेन्री पिरेनः- समाजात रहाणाऱ्या मणूष्यांच्या उपलब्धीची कहाणी म्हणजे इतिहास होय.

५) क्रोसे- सर्व इतिहास समकालिन असतो.

६) कोटींग:- इतिहास म्हणजे मानवी कृतींची नोंद.

७) कार्लाइल:- थोरांची चरीत्रे म्हणजे इतिहास.

८) हर्डरः- इतिहास म्हणजे घटनांची साखळी होय.

९) ॲक्टन- इतिहास हि मानवी स्वातंत्र्याची कथा आहे.

१०) सर जॉन सिलीः- वर्तमानकालीन राजकारण हा भावी इतिहास, व समालीन राजकारण हा वर्तमानकाळातील इतिहास असतो. ११) इ. एच. कारः- वर्तमानकाळ आणि भुतकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास.

१२) कार्ल मार्क्सः- आजपर्यंतचा इतिहास हा दुसरे काहीही नसून केवळ वर्गसंघर्ष आहे.

१३) आर्नाल्ड टायम्बीः- इतिहास म्हणजे दुसरे काहीही नसून संस्कृतीच्या उदयअस्ताची ती कथा आहे.

१४) प्रो. ए. एल. राऊसः विशिष्ट अशा भौगालिक परिस्थितीत समाज करुन रहाणाऱ्या मानवी जीनवनाची गाथा म्हणजे

इतिहास होय.

१५) प्रो. नेव्हिन्स- इतिहास हा वर्तमानकाळ व भुतकाळ यांना जोडणारा पुल आहे.

१६) धर्मानंद कोसंबीः- इतिहास म्हण्जे, साधन आणि उत्पादन यांच्या परस्पर संबंधातील एक अनुक्रमवार अशी घटना होय.

१७) रियासतकार सरदेसाईः इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा.

१८) दि. के. देशपांडे:- काव्य, शास्त्र, आणि विनोद या तिन्हींचा उत्तम मिलाप म्हणजे इतिहास.

१९) डॉ. बी. आर. अंबेडकरः इतिहास म्हणजे बदल.

२०) वि. का. राजवाडेः- दिव्यकालांच्या अवतरणाखाली, मानवकुलांच्या हालचालींची विश्वसनिय हकिकत म्हणजे इतिहास.

**इतिहासाचे स्वरुपः-**

इतिहास म्हणजे काय ? या प्रश्नातून इतिहासाचे स्वरुप समोर येण्यास मदत होते. मानवाने प्रगती आणि प्रगतीतून अधिकाधिक प्रगतीची कास धरली. त्यातून आदिमानचे रुपांतर आजच्या प्रगत मानवात झाले. मानवाची किंबहूना मानवाच्या प्रगतीची ही वाटचाल भुतकाळापासून या वर्तमान क्षणापर्यंत भविष्याचा वेध घेणारी आहे. चार्लस डार्वीनने यास उत्क्रांतीवादाचा सिद्धांत असे म्हटले आहे. डार्विनच्या सिद्धांताच्या प्रतिपादनानंतर इतिहासलेखनासही कलाटनी मिळाली. प्राचीन काळात इतिहासाचे विषय राजा, दरबार, मंत्री, सेनापती, युद्ध, संघर्ष, लढे, तह, आणि पराक्रम इत्त्यादी संदर्भात असत. राजाबरोबर प्रजेला इतिहासात स्थान नव्हते. मध्ययुगात लिहलेला इतिहास हा सत्ता आणि धर्म या संदर्भात होता. १४ व्या आणि १५ व्या शतकात युरोपात झालेल्या प्रबोधनामुळे अनेक बदल झाले. रुढी, परंपरा, चालीरीती यापेक्षा बुद्धीला पटणाऱ्या गोष्टी अथवा कार्यावर विश्वास बळावत गेला. यातून नवनविन शोध लागले. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने युरोपात क्रांतीची प्रेरणा निर्माण झाली. या क्रांतीने स्वतंत्र्यता, बंधुता, राष्ट्रवाद आणि लोकशाही या तत्वांना पुरस्कृत केले.

१९ व्या शतकात इतिहास लेखनाचा केंद्रबिंदू सामान्य व्यक्ती आहे. असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या दृष्टीकोनातून इतिहासलेखन सुरु झाले. ग्रिक आणि रोमन इतिहासकारांपासून हेगेल आणि मार्क्सच्या इतिहासाने इतिहासलेखनाचे तत्वे विषद केली. लिओपोल्ड रेंकेने इतिहासलेखनाचे महत्वाचे तत्व सांगीतले म्हणून त्याला, आधुनिक इतिहासलेखनाचा जनक असे म्हणतात. इतिहासाबद्दलचे इतिहासकारांचे विचार, व्याख्या, तत्व यातून इतिहासाचे स्वरुप लक्षात येते.

**१) सर्व इतिहास हा समकालीन असतोः** इटालियन इतिहासकार आणि तत्वज्ञ बेनेडीटो क्रोसे याने *History Its Theory and Practice* या ग्रंथात सर्व इतिहास हा समकालीन असतो असे तो म्हणतो. त्याच्या या वक्तव्याला प्रसिद्ध इतिहासकार आर. जे कॉलिंगवुड यांनी आपल्या *Philosophy of History* या ३२ भाषणांमध्ये पाठींबा दर्शविला आहे. याचा थोडक्यात अर्गी असा कि प्रत्येक घटनेचा अर्थ हा विहित परिस्थितीत लावता येतो. भुतकाळातील घटनांची मांडणी हा इतिहासकार वर्तमान परिस्थितीत करीत असतो. त्यामुळे इतिहास हा समकालीन परिस्थितीत नव्याने मांडता येतो. इतिहास मांडण्याची भाषासुद्धा समकालीन असते.

**२) इतिहास हा भुतकाळाचा अभ्यास असतोः** इतिहासात घडलेल्या घटना- प्रसंग आणि कार्य भुतकाळातील असतात. इतिहासकार या घटीत घटनांचा अभ्यास समकालीन परिस्थितीत करीत असतो. भुतकालीन घटनांचा शोध घेण, सत्य शोधणे, अन्वयार्थ लावणे आणि घटनांची मांडणी करणे हे कार्य इतिहासकार करीत असतो. घटनांचे वर्णन करणे एवढीच मर्यादित जबाबदारी इतिहासकाराची नसते. भुतकाळाचा संपूर्ण अभ्यास हा इतिहासकारचा विषय असतो.

**३) इतिहास हा घटनांच्या कारण परंपरांचा अभ्यास असतो** इतिहासकार कोणताही इतिहास लिहित असतांना काही मुलभुत अशी तथ्ये स्विकारीत असतो. या तथ्यांचा तो अन्वयार्य लावून घटनांच्या पाठीमागील कारण परंपरा, घटनेच्या मागील कारणांची जंत्री आणि घटनेचे झालेले परिणाम अर्थात एका घटनेतून निर्माण झालेली दुसरी घटना यांचा एकत्रीत अभ्यास म्हणजे इतिहास होय.

**४) इतिहास हा उपयुक्त विषय आहे:** इतिहास म्हणजे भुतकाळाचा अभ्यासविषय असला तरी अज्ञात घटना, कार्य विचार आणि आचारांचा अभ्यास हा इतिहासाच्या कक्षेत येतो. भुतकाळातील अज्ञात घटनांना बोलके करण्याचे सामर्थ इतिहासात असते. म्हणूनच सद्य वर्तमानकाळ हा भुतकाळाचा परिपाक असतो आणि वर्तमानकाळ हा भविष्याचा निर्देशक असतो असे म्हणता येईल.

**५) मानवी कर्तृत्व हा इतिहासाचा आत्मा असतो:** मानुवाच्या प्रगतीचा आढावा म्हणजे इतिहास असे गोविद सखाराम सरदेसाई म्हणतात. मानवाच्या उत्पत्तीपासून ते आजगायत केलेल्या प्रगतीचा आढावा हा मानवाचा इतिहास होय. आदिमानवाने जिवनासाठी संघर्ष दिला, शेतीचा शोध, मानवाच्या कर्तृत्वाचा पाया मानण्यास हरकत नाही. प्रागैतिहासिक मानवाची ऐतिहासिक मानवाकडे झालेली वाटचाल, मानव समाजाच्या कर्तृत्वाचा आढावा घेते, म्हणून तोच इतिहासाचा अभ्यासविषय असतो.

**६) भुतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यातील अविरत संवाद म्हणजे इतिहास** :- २० व्या शतकातील ब्रिटीश इतिहासकार इ. एच. कार यांनी *what is History ?* या ग्रंथात वरील विचार मांडले आहेत. त्यांच्यामते इतिहासाचा शोध, अभ्यास, आणि मांडणी वर्तमानात राहून इतिहासकार करीत असतो. इतिहासकार वर्तमानातील घटना, विचार आणि तत्व यांनी प्रभावित असतो. वर्तमानत राहून भुतकाळातील घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न इतिहासकार करीत असतो. हा संवाद इतिहासकार शोधत असतो. या संवादातून इतिहास साकार होत असतो.

**७) इतिहास हे राष्ट्राचे स्मृती संकलन आहे:** मानसाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास असा विचार ब्रिटीश विचावंत फ्रान्सिस बेकन मांडतो. मानवाला स्मृतीबरोबर विस्मरण प्राप्त आहे. गतकालीन घटनांच्या स्मृती मानव करुन घेत असतो. गतकालीन घटनांचा आढावा स्मरण आणि अवलोकन मानव करीत असतो. म्हणजेच स्मृतीचे स्मरण तो करीत असतो. अशासलग एक एक स्मृतीच्या संकलनातून इतिहास साकार होत असतो. ८) इतिहासाची पुनरावृत्ती होतेः इतिहासाची कधी कधी पुनरावृत्ती होत असते असा एक विचारप्रवाह इतिहासकारात आहे. तर इतिहासाधी पुर्नरावृत्ती कधीच होवू शकत नाही असे मानणारा एक वर्ग इतिहासकारांचा आहे. इतिहासाची पुर्नरावृत्ती होते. म्हणजेच घडलेली घटना दुसऱ्या घटनेच्या सारखी असते. मात्र हे साम्या घटनेपुरते मर्यादित असून पुर्णतः साम्य दोन घटनांमध्ये दिसून येत नाही. भुतकाळातील घटना स्थळ, काळ, आणि व्यक्तीच्या संदर्भात कधीच एकसारखी घडून येतनाही. उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास युरोपात झालेल्या क्रांत्या एकसारख्या नव्हत्या फक्त या क्रांत्यांनी जुलमी राजवटी उलघुन टाकल्या एवढाच साम्यपणा या घटनांमध्ये दिसून येतो. ९) इतिहासाची गती सरळ कि चक्राकारः मानव समाजरचना करुन रहातो. चांगले-वाईट यासाठी मानव स्वतःहाला जाबाबदार धरतो. धार्मिकदृष्ट्या विचार करता, वेदिक, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, रोम, आणि ग्रिक धर्मात इतिहासाची वाटचाल चक्राकार मानण्यात आली आहे. मध्ययुगात जगात इतिहास हा ईश्वरनियंत्रीत करतो अशी मान्यता होती. आधुनिक काळात बोसूए ते ओसवाल्ड स्पेंगलर आणि आर्नाल्ड टॉयम्बी यांनी इतिहासाची वाटचाल चक्राकार मानली. तर ॲन्टोनी कांडरसेट आणि टुगो यांनी सरळ रेषेत इतिहासाची वाटचाल होते असा सिद्धांत मांडला.

**१०) इतिहासाने भविष्य वर्तवावे कि नाही:** इतिहास शास्त्र कि कला या प्रश्नाया निर्णय झाल्यावर नियमाप्रमाणे इतिहासातही भविष्य वर्तवता येणे शक्य आहे. १८७० ला जर्मनीचे एकिरण बिस्मार्कने घडवले. जर्मनीचा विकास म्हणजे फ्रान्सचे युरोपातील एकटेपण, या सुत्राचा वापर बिस्मार्कने सत्तेवर असेपर्यंत केला. केसर विल्यम दुसरा ने या तत्वाचा त्याग केला तेव्हा जर्मनीचा विनाश अटळ आहे असे विचार राजकारणी, विचारवंत आणि इतिहासकारांनीही नमूद केले होते. शिवाय कार्ल मार्क्सने कामगार आणि भांडवलदारांचा लढा संघर्ष अटळ आहे आणि या संघर्षात कामगारांच्या विजयाचे भविष्य वर्तवले आहे. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की, भविष्य वर्तविण्याची क्षमता इतिहासकारामध्ये असते. फारण इतिहास हे सुद्धा इतर भौतिक शास्त्रांप्रमाणे शास्त्र आहे.अशा प्रकारे वरील विवेचनावरुन आपणास इतिहासाचे स्वरुप दिसून येते.

## इतिहासाची साधने
### पुरातत्वीक साधने

प्राचीन इतिहासाच्या अभ्यासाच्या साधनांमध्ये पुरातत्त्वीय साधनांना भौतिक साधने असेही म्हणतात. प्राचीन भारतीयांनी पुरातत्त्वीय किंवा भौतिक साधनांचे प्रचंड भांडार मागे ठेवले आहे. दक्षिण भारतातील दगडी मंदिरे आणि पूर्व भारतातील विटांनी बांधलेले विहार किंवा मठ आजही प्राचीन काळातील वास्तुकलेच्या वैभवांची साक्ष देत उभे आहेत. परंतु त्यापेक्षा कितीतरी वास्तू जमिनीच्या उदरात गडप झाल्या आहेत. जिथे या वास्तू जमिनीत गाडल्या गेल्या तिथे उंचवटे तयार झाले. असे उंचवटे भारतभर विखुरलेले आहेत. यापैकी काही उंचवट्यांखाली एका संस्कृतीचे, काही उंचवट्यांखाली एकापेक्षा जास्त संस्कृतीचे तर काही उंचवट्यांखाली महत्त्वाच्या संस्कृतीचे अवशेष दडलेले आहेत. काही उंचवटे रंगीत मृद्‌भांड संस्कृतीचे * (रंगीत मृदू किंवा मातीच्या भांड्यांची संस्कृती), काही सातवाहन संस्कृतीचे तर काही कुशाण संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. ज्या उंचवट्यांखाली महत्त्वाच्या संस्कृतीचे अवशेष दडले असतात तिथे इतरही संस्कृतीचे अवशेष असतात. परंतु त्या संस्कृती गौण किंवा कमी महत्त्वाच्या असतात. जे उंचवटे एका पेक्षा जास्त संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात तेथे एकाखालोखाल एक असे क्रमाने संस्कृतीचे थर आढळतात. पुष्कळदा असे थर परस्परात मिसळून गेलेले आढळतात.उंचवट्यांचे उत्खनन उभा छेद देऊन व आडवा छेद देऊन असे दोन प्रकारे केले जाते. उभा छेद एका विशिष्ट भागापुरताच मर्यादित असतो तर आडव्या छेदात संपूर्ण उंचवट्यांचेच उत्खनन केले जाते. यामुळे उत्खनन करणाऱ्या संशोधकाला उंचवट्यांखाली दडलेल्या एखादया संस्कृतीची संपूर्ण कल्पना येते.आज भारतात जे विविध ठिकाणी उत्खनन झाले आहे ते उभा छेद देऊन झाले आहे. असे उत्खनन एक तर तुलनात्मकदृष्ट्या कमी खर्चाचे असते शिवाय अशा उत्खननात आढळलेल्या पुरातत्त्वीय अवशेषांचा कालानुक्रम लावणे सोपे असते. आडवा छेद देऊन करण्यात येणारे उत्खनन अत्यंत खर्चिक असल्याने अशा प्रकारचे उत्खनन तुरळक स्वरूपात होते. शिवाय अशा उत्खननाचे निर्णय तत्कालीन भौतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास अपुरे ठरतात.वायव्य भारत, पश्चिमउत्तर प्रदेश व राजस्थान या भागातील हवामान शुष्क असल्याने तेथील उत्खननात मिळालेले पुरातन अवशेष बरेचसे सुस्थितीत आहेत. परंतु गंगेचे खोरे, त्रिभुज प्रदेश येथील हवामानात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्याने तेथील उत्खननात सापडलेल्या लोखंडाच्या वस्तू गंजलेल्या आहेत. शिवाय तेथील मातीचे बांधकामही सुस्थितीत नसल्याने तेथील संस्कृतीचा अभ्यास करताना अभ्यासकांसमोर अनेक अडचणी उद्‌भवतात. अशा उत्खननात आढळून आलेले पक्क्या विटांचे व दगडांचे बांधकाम मात्र त्या भागातील प्राचीन संस्कृतीवर पर्याप्त प्रकाश टाकतात.वायव्य भारतात जे उत्खनन झाले त्यात इ.स.पू. २५०० वर्षाच्या संस्कृतीचे अवशेष आढळून आले आहेत. गंगेच्या खोऱ्यातील उत्खननामुळे तेथील प्राचीन संस्कृतीच्या भौतिक जीवनाची कल्पना येते. या उत्खननांमुळे तत्कालीन घरांसाठी वापरण्यात आलेले साहित्य, घरांचे आकार व त्यांची रचना, वापरण्यात येणारी भांडी, अवजारे, अन्न इ.ची कल्पना येते. दक्षिण भारतातील काही भागात मृत व्यक्तीबरोबर तिची भांडी-कुंडी, अवजारे, हत्यारे व वापरावयाच्या इतर वस्तू पुरल्या जात. अशा थडग्यांभोवती मोठमोठ्या दगडांना रचून त्यांचे आवरण तयार केले जाई. अशा बांधकाम रचनेला 'महापाषाणी' *(Megaliths)* रचना म्हणतात. प्राचीन उंचवट्यांचे शास्त्रशुद्ध उत्खनन करण्याच्या शास्त्राला 'पुरातत्त्व विज्ञान' किंवा 'पुरातत्त्वशास्त्र' *(Archaeology)* म्हणतात.उत्खनात मिळालेल्या वस्तूंच्या अवशेषांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने परीक्षण केले जाते. त्यानुसार त्यांचा काळ ठरविला जातो. त्या पद्धतीला रेडियो कार्बन 'पद्धती म्हणतात.या पद्धती मागील गृहित सूत्र असे की प्रत्येक जीवित घटकांत कार्बन असतो. जेव्हा तो जीवित घटक मृत होतो तेव्हा त्याची विशिष्ट प्रकारचा कार्बन ज्याला C14 म्हणतात, तो ग्रहण करण्याची शक्ती संपुष्टात येते. व त्या वस्तूत असलेल्या C14 च्या -हास प्रक्रियेला सुरवात होते. त्याला 'उत्सर्जन प्रक्रिया' म्हणतात. C 14 हा C12 चा रेडियोधर्मी घटक आहे. कोणत्याही जीवित घटकात C 14 आणि C12 हे समप्रमाणात असतात. C14 चा किती प्रमाणात -हास झाला हे C12 चे प्रमाण किती आहे त्यावरून ठरविता येते. तसेच त्या -हास प्रक्रियेसाठी किती कालावधी लागला त्यावरून त्या वस्तूचा काळ ठरविता येतो. ज्या वस्तुत C14 चे प्रमाण कमी आढळते ती निश्चितच जास्त प्राचीन असते व ज्या

वस्तूत *C14* चे प्रमाण जास्त असते ती तुलनात्मकदृष्ट्या अलीकडच्या काळातील असते. एखादया मृत घटकातील पन्नास टक्के *C14* बाहेर पडण्यास ५५६८ वर्षे लागतात. शिल्लक असलेल्या *C14* वरून त्या वस्तूचे वय ठरविता येते.वनस्पतीचे अवशेष आणि परागकणांच्या पृथःकरणावरून वातावरण आणि वनस्पतीचा अभ्यास केला जातो. या अभ्यासावरून काश्मीर आणि राजस्थान या प्रदेशात इ. स. पू. ७००० ते ६००० च्या आसपास शेती होत असल्याचे दिसून येते. उत्खननात ज्या धातूंच्या शिल्पाकृती आढळून येतात त्यातील धातूंचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून त्या कुठे प्राप्त झाल्या तसेच धातुतंत्र कसे विकसित झाले ते ठरविला जाते. प्राण्यांच्या सापडलेल्या अस्थीवरून ते प्राणी पाळीव होते का, तसेच त्यांचा कोणत्या प्रकारच्या कामासाठी उपयोग होत होता ते ठरविले जाते.

**नाणी:**

प्राचीन भारताच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी बरीच नाणी जमिनीच्या पृष्ठभागावर सापडली आहेत. उत्खननातही भरपूर नाणी आढळून आली. नाण्यांच्या अभ्यासाच्या शास्त्राला 'नाणेशास्त्र' *(Nu-mismatics)* म्हणतात. प्राचीन भारतात आजच्याप्रमाणे कागदी चलन नव्हते. प्राचीन नाणी ही सुवर्ण, रजत, ताम्र व शिशापासून बनविली जात. ही नाणी बनविण्यासाठी भाजलेल्या मातीचे साचे बनविले जात. असे साचे फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यातील बहुतेक साचे कुशाण काळातील म्हणजे इ.स. च्या पहिल्या तीन शतकातील आहेत. गुप्तोत्तर काळात अशा साच्यांचा वापर जवळ जवळ संपुष्टात असलेला दिसतो.प्राचीन काळी आजच्यासारखी बँक व्यवस्था नव्हती. त्या काळातील लोक नाणी माती किंवा पितळेच्या पात्रात सुरक्षित जागी ठेवित व गरजेनुसार त्याचा वापर करीत. अशा पात्रात ठेवलेली भारतीय तसेच रोमन नाणी देशाच्या निरनिराळ्या भागात आढळून आलेली आहेत. त्यापैकी बरीचशी नाणी कोलकाता, पाटणा, लखनौ, दिल्ली, जयपूर, मुंबई, मद्रास येथील वस्तुसंग्रहालयात जपून ठेवण्यात आली आहेत. बरीचशी भारतीय नाणी नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, अफगाणिस्तान येथील वस्तूसंग्रहालयात जपून ठेवली आहेत. इंग्रजांनी भारतावर राज्य केले असल्याने इंग्लंडमध्ये ही बरीच भारतीय नाणी खाजगी व सार्वजनिक वस्तूसंग्रहालयात आढळून येतात. भारतातील महत्त्वाच्या राजघराण्यांच्या नाण्यांची एक सूची तयार करण्यात येऊन ती प्रकाशित करण्यात आली आहे. भारतीय नाण्याची सूची कोलकाता व लंडनच्या वस्तुसंग्रहालयात आज उपलब्ध आहे.अगदी सुरवातीच्या भारतीय नाण्यांवर काही चिन्हे किंवा प्रतीके आढळून येतात. परंतु त्यानंतरच्या भारतीय नाण्यांवर राजांची व देवतांची नावे तसेच तारखा आढळून येतात. ज्या परिसरात ही नाणी आढळून आलीत त्यावरून त्या भागात ही नाणी व्यवहारात होती हे दिसून येते. या आढळलेल्या नाण्यांवरून अनेक राजकीय वंशावळ्यांचा तसेच उत्तर अफगाणिस्तानातून भारतात आलेल्या इंडो ग्रिकांचा इ. स. पू. दुसऱ्या व पहिल्या शतकातील इतिहास समजण्यास मदत होते.नाणी देशाच्या आर्थिक इतिहासावर पर्याप्त प्रकाश टाकतात. काही नाणी राज्यकर्त्यांच्या आदेशानुसार व्यापाऱ्यांच्या श्रेणी व सुवर्णकारांद्वारे प्रचारात आणली जात. त्यामुळे व्यापाराला चालना मिळे. सर्वात जास्त नाणी मौर्योत्तर काळातील आढळून आली आहेत. ही नाणी सुवर्ण, रजत, ब्राँझ, तांबे, शिसे व मिश्र धातूची होती. गुप्तकाळात सुवर्णाच्या नाण्यांचा वापर सर्वात जास्त होता. या सर्वावरून मौर्योत्तर काळात व गुप्तकाळातील काही ठराविक काळात व्यापाराची अत्यंत भरभराट झाली होती है दिसून येते. गुप्तोत्तर काळातील फार थोडी नाणी आढळून आली आहेत. त्यामुळे या काळात भारतीय व्यापाऱ्याला ओहोटी लागल्याचे दिसून येते.नाण्यांवर राजांच्या व देवतांच्या प्रतिमा तसेच निरनिराळी प्रतीके आढळून येतात. त्यावरून त्या काळातील कला व धार्मिक श्रद्धांची कल्पना येते.

**आलेख:**

आलेखांना नाण्यापेक्षा जास्त महत्त्व आहे. आलेखांच्या अभ्यासाला 'पुराभिलेखशास्त्र' *(Epigraphy)* म्हणतात. या आलेखांवरील प्राचीन लिपी व इतर उल्लेख यांच्या अभ्यासाच्या शास्त्राला 'पुरालिपीशास्त्र' *(Palaeography)* म्हणतात. हे आलेख शिक्के, दगडी स्तंभ, खडक, ताम्रपट,

मंदिरांच्या भिंती, विटा व प्रतिमांवर कोरलेले आढळून आले आहेत.भारतातील सर्वात प्राचीन आलेख हे दगडांवर कोरलेले आहेत. इ.स.च्या सुरवातीपासून यासाठी ताम्रपटांचा वापर होताना दिसतो. परंतु याही वेळेस दक्षिण भारतात दगडांवर आलेख कोरण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू होती. दक्षिण भारतातील प्राचीन मंदिरांच्या भिंतींवर कोरलेले आलेख आजही सुस्थितीत आहेत.ण्यांप्रमाणेच देशातील निरनिराळ्या वस्तुसंग्रहालयात आलेख सुरक्षित ठेवण्यात आले आहेत. सर्वात जास्त आलेख म्हैसूरच्या पुराभिलेख संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत. सर्वात प्राचीन आलेख हे प्राकृत भाषेत असून ते इ.स.पू. तिसऱ्या शतकातील आहेत. इ.स.च्या दुसऱ्या तिसऱ्या व चौथ्या शतकात आलेखासाठी संस्कृत भाषेचा वापर फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. या काळात प्राकृत भाषेतही तुरळक प्रमाणात आलेख कोरले जात होते. इ.स.च्या ९ व्या आणि १०व्या शतकात प्रादेशिक भाषांमध्ये आलेख रचले जाऊ लागले. मौर्य, मौर्योत्तर आणि गुप्तकाळातील आलेखांची सूची तयार करण्यात येऊन प्रकाशित करण्यात आली आहे. गुप्तोत्तर काळातील आलेख मात्र शास्त्रशुद्धरीत्या सूचिबद्ध केलेले नाहीत. दक्षिण भारतातील आलेखांची स्थलानुसार सूची तयार करण्यात आली आहे. तरीही ५०,००० पेक्षा जास्त आलेख प्रकाशनाच्या प्रतीक्षेत पडून आहेत.हडप्पा किंवा सिंधू संस्कृतीची लिपी ही चित्र लिपी असून त्यात चित्रांच्या व चिन्हांच्या माध्यमातून आशय व कल्पना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. लिपी वाचण्यात संशोधकांना अजूनपर्यंत यश आले. नाही. अशोकाचे आलेख हे ब्राह्मी लिपीत कोरलेले असून ते डावीकडून उजवीकडे लिहिण्यात आले आहेत तर त्याचे काही आलेख खरोष्टी लिपीत असुन ते उजवीकडून डावीकडे लिहिण्यात आले आहेत. भारताचा वायव्य भाग वगळता ब्राह्मी लिपी संपूर्ण भारतात प्रचलित होती. आजच्या पाकिस्तान व अफगाणिस्तानात अशोकाचे आढळून आलेले आलेख ग्रिक आणि अरेमिक लिपीत कोरलेले आहेत. गुप्तकाळापर्यंत ब्राह्मी हीच भारतातील मुख्य लिपी होती. त्यामुळे इ.स. सातव्या शतकापर्यंतचे आलेख वाचण्यात पुरालिपी तज्ज्ञांना विशेष अडचणी येत नाहीत. परंतु इ.स. सातव्या शतकानंतर जे आलेख कोरले गेले त्यांच्यात प्रादेशिक लिपीचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाल्याने त्यांचे वाचन करण्यात अनेक अडचणी येतात. सर्वात प्राचीन आलेख इ.स.पू. २५०० च्या आसपासचे असून ते हडप्पा संस्कृतीच्या मुद्रांवर आढळून येतात. आजतागायत त्यांना वाचण्यात संशोधकांना यश आलेले नाही. ज्या आलेखांचे वाचन करण्यात अभ्यासकांना यश आले आहे त्यापैकी सर्वात प्राचीन आलेख इ.स.पू. तिसऱ्या शतकातील सम्राट अशोकाचे आहेत. फिरोजशहा तुघलकला मेरठ आणि हरियाणात टोपरा येथे अशोकाचे स्तंभलेख मिळाले. त्याने ते दिल्ली येथे आणून ते पंडितांकडून वाचण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्याला अपयश आले. पुढे १८ व्या शतकात ब्रिटिशांना अशोकाचे आलेख आढळलेत पण त्यांनाही ते वाचण्यात अपयश आले. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीतील एक सनदी नोकर जेम्स प्रिंसेप हा अशोकाच्या आलेखांचे अचूक वाचन करणारा पहिला अभ्यासक होय.आज उपलब्ध असलेल्या आलेखांचे आपण निरनिराळ्या गटात वर्गीकरण करू शकतो. काही आलेखांमध्ये प्रशासकीय अधिकारी व सर्वसामान्य जनतेसाठी राजाज्ञा व निर्णय असून त्यात सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय बाबींचा समावेश आहे. इतर आलेखांमध्ये बौद्ध, जैन, वैष्णव, शैव, इ. धर्म पंथांच्या उपासकांचे भक्तीपर संदेश आहेत. ते स्तंभ, शिला, मंदिरे, प्रतिमा यावर कोरण्यात आले आहेत. काही आलेखावर शासकांच्या विजयांच्या व पराक्रमाच्या नोंदी आहेत. त्यात शासकाचे पराभव व त्यांच्या उणिवा यांचा अभाव आढळतो. समुद्रगुप्ताचा 'अलाहाबाद प्रशस्ती ' याचे उत्तम उदाहरण आहे. याशिवाय काही आलेख दानपत्राच्या स्वरूपाचे आहेत. त्यात राजे, व्यापारी व कारागीर यांनी पैसा, पशू, जमिनी दान दिल्याचे उल्लेख आहेत.शासक व राजकीय प्रमुखांनी दिलेली दानपत्रत्त प्रामुख्याने तांब्याच्या पत्र्यावर कोरली असून त्या वरून तत्कालीन जमीन व्यवस्था व प्रशासन पद्धती यांचा अभ्यास करण्यास मदत होते. या दानपत्रात दान दिलेल्या जमिनी, त्यावर आकारण्यात येणारा महसूल, साधू, धर्मगुरू, मंदिरे, मठ, अधिकारी व व्यक्तींना दानात दिलेल्या जमीनी इ. चा उल्लेख आहे. ही दानपत्रत्त प्राकृत, संस्कृत, तामिळ, तेलुगू इ. भाषांत आढळून येतात.

## प्राचीन भारताच्या इतिहासाची साहित्तीक साधने

लिखित साधने:इ.स.पू. २५०० च्या आसपास भारतीयांना लेखन कला अवगत असली तरी आपली सर्वात प्राचीन हस्तलिखिते इ.स. चौथ्या शतकापेक्षा जुनी नाहीत. ती प्रामुख्याने मध्य आशियात आढळून आली आहेत. भारतात आढळून आलेली हस्तलिखिते ही भूर्जपत्रे व ताड वृक्षाच्या पानांवर लिहिलेली आहेत. काही हस्तालिखिते मेंढ्यांच्या कातड्यांवर तसेच लाकडाच्या पृष्ठभागावर लिहिली आहेत. वास्तविक हे आलेखच आहेत परंतु त्यांना हस्तलिखिते म्हणतात. जेव्हा छापण्याच्या कलेचा शोध लागला नव्हता तेव्हा हस्तलिखितांना अनन्यसाधारण महत्त्व होते. प्राचीन संस्कृत हस्तलिखिते भारतभर आढळून आली असली तरी दक्षिण भारत, काश्मीर, नेपाळ मध्ये ती विपुल प्रमाणात आढळून आली आहेत. आज आलेख वस्तुसंग्रहालयात तर हस्तलिखिते ही वाचनालयात जतन करून ठेवण्यात आली आहेत.

**वैदिक साहित्य:**

बहुतेक प्राचीन भारतीय ग्रंथांचा विषय धार्मिक आहे. भारतीयांच्या प्राचीन धार्मिक साहित्यात वेद, रामायण, महाभारत, पुराणे इ. ग्रंथांचा प्रामुख्याने समावेश होतो. या ग्रंथांतून तत्कालीन भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर पर्याप्त प्रकाश टाकण्यात आला असला तरी त्यातील घटनांचा काळ आणि स्थळ ठरविण्यात अनेक अडचणी येतात. इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. १००० हा ऋग्वेद रचनेचा काळ मानला जातो. परंतु अथर्ववेद, यजुर्वेद, ब्राह्मणे, उपनिषदे यांची रचना इ.स.पू. १००० ते इ.स.पू. ५०० या कालखंडात झाली असावी, असा विद्वानांचा कयास आहे. ऋग्वेदात प्रामुख्याने ऋचा (प्रार्थना) आहेत तर इतर वैदिक साहित्यात प्रार्थनेबरोबर, धार्मिक विधी, जादूटोणा आणि पौराणिक कथांचा अंतर्भाव आहे. उपनिषदांमध्ये तात्त्विक विषयांवर चर्चा करण्यात आली आहे. वैदिक साहित्याचे आकलन होण्यासाठी वेदांगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

वेदांग म्हणजे वेदांची पूरक शास्त्रे होत.

१. शिक्षा: यात वेदातील ऋचांच्या उच्चारांजे नियम सांगितले आहेत.

२. कल्प: यात यज्ञाचे विधी व नियम आहेत.

३. व्याकरण: यात भाषेचे नियम आहेत.

४. निरुक्त: हे शब्दव्युत्पत्ती शास्त्र होय.

५. छंदस किंवा छंद: हे वृत्तविषयक शास्त्र आहे आणि

६. ज्योतिष : हा फल ज्योतिष ग्रंथ आहे.

यापैकी शिक्षा व कल्प ही सर्वात महत्त्वाची वेदांग मानली जातात. या सर्व विषयांच्या संदर्भात सूत्रबद्धपद्धतीने बरेच लिखाण झाले. हे सारे लिखाण गदयात्मक होते. इ.स.पू.४०० च्या सुमारास लिहिले गेलेले पाणीनीचे व्याकरण याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. यात व्याकरणाच्या नियमाबरोबर तत्कालीन समाज, आर्थिक जीवन व संस्कृतीवर भरपूर प्रकाश टाकण्यात आला आहे.रामायण व महाभारत ही महाकाव्ये आणि महत्त्वाची पुराणे ही अंतिमत: इ.स. ४०० च्या सुमारास संकलित केली गेली. दोन महाकाव्यांपैकी महर्षी व्यास रचित 'महाभारत' या महाकाव्याची रचना अगोदर झाली. यात इ.स.पू.१० वे शतक ते इ.स. ४ थे शतक या काळातील घटनांचा आढावा घेण्यात आला आहे. या महाकाव्याच्या सर्वात प्राचीन आवृत्तीत ८८०० श्लोक असून त्याचे नाव 'जय' होते. त्यात भर पडून ते २४,००० श्लोकांचे झाले. त्याला 'भारत' असे म्हणण्यात येऊ लागले. या महाकाव्याची अंतिम आवृत्ती म्हणजे 'महाभारत'. त्यात १,००,००० श्लोक आहेत. याला 'शतसहस्री संहिता' असेही म्हणतात. कौरव-पांडव संघर्ष हा या महाकाव्याचा मुख्यकथा भाग असून त्यातील वर्णनात्मक भाग उत्तर वैदिक काळाशी तर नीतिवचनाचा भाग मौर्योत्तर व गुप्तकाळाशी संबंधित आहे.महर्षी वाल्मिकी रचित रामायणात मूळ ६००० श्लोक असून त्यात भर पडून ते १२,००० व अंतिमत:

२४,००० श्लोकांचे झाले. रामायण हे महाकाव्य महाभारतापेक्षा जास्त एकीकृत आहे. रामायणाच्या रचनेला इ.स.पू. ५ व्या शतकात सुरवात झाली. त्यानंतर त्याचा पाच टप्प्यात विकास होत गेला. शेवटचा व पाचवा टप्पा इ.स. १२ व्या शतकात पूर्ण झाला. संपूर्ण रामायणाचा एकत्रित विचार केला तर त्याची रचना महाभारताच्या पश्चात झाल्याचे दिसून येते.वेदोत्तर काळात निरनिराळ्या धार्मिक विधी संदर्भात भरपूर साहित्य रचल्या गेले. श्रौतसूत्रात राजांनी करावयाच्या मोठ्या प्रमाणावरील यज्ञांचा तसेच पहिल्या तीन वर्णाच्या लोकांनी करावयाच्या यज्ञांचा विधी सांगितला आहे. जन्म, नामकरण, व्रतबंध किंवा मौंज, विवाह अंत्यक्रिया इ. समयी करावयाच्या विधीसंबंधी माहिती गृह्यसुत्रात सांगितली आहे. श्रौतसूत्र आणि गृह्यसूत्र यांचा रचनाकाळ इ.स. पू. ६ वे ते इ.स.पू. ३ रे शतक असा मानला जातो. शुल्व सूत्रात यज्ञकुंड, त्याची जागा, मोजमाप, बांधकाम यांचे सूक्ष्म विवेचन करण्यात आले आहे. शुल्व सूत्रही भूमिती व अंकगणिताची सुरवात मानली जाते.

**पुराणे:**

प्राचीन भारताचा अभ्यास करण्यासाठी पुराणे ही उत्तम साधने आहेत. त्यात प्राचीन भारतातील राजघराण्यांच्या वंशावळ्या तसेच परंपरा यांचे उल्लेख आढळतात. पुराणे १८ असून विष्णू, वायु, ब्रह्म, भागवत, मत्स्य ही प्रमुख पुराणे आहेत. याशिवाय १८ उपपुराणे आहेत.

**बौद्ध साहित्य:**

बौद्ध साहित्याच्या 'जातक' 'पिटक' आणि 'निकाय' या तीन शाखा आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाची शाखा म्हणजे **'त्रिपिटक'.**

त्रिपिटकाचे विनय पिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन भाग असून ते पाली भाषेत लिहिण्यात आले. त्यात बौद्ध धर्माच्या तत्त्वांची चर्चा करण्यात आली आहे. या शिवाय पाली भाषेतील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे बौद्ध साहित्य म्हणजे 'मिलिंदपन्हा', 'दीपवंश' आणि 'महावंश' हे ग्रंथ. मिलिंदपन्हा मध्ये ग्रीक राजा मिनॅण्डर (मिलिंद) आणि बौद्ध भिक्षू नागसेन यातील संवाद आहे. दीपवंश आणि महावंश या ग्रंथांची रचना सिलोनमध्ये झाली असली तरी त्यात इ.स. पू. सहाव्या ते इ.स.पू. चौथ्या शतकातील भारताच्या इतिहासाची चर्चा करण्यात आली आहे. या ग्रंथातून आपल्याला चंद्रगुप्त मौर्याचा इतिहास समजण्यास मदत होते. 'अंगुत्तर निकाय' या बौद्ध धर्माच्या महत्त्वाच्या ग्रंथात इ.स.पू. सहाव्या शतकातील भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक जीवनाची चर्चा करण्यात आली आहे. याशिवाय अश्वघोषचे 'महाविचस्य', नागार्जुनचे ''तसहस्त्रिका', 'प्रज्ञापरिमित ' आणि 'माध्यमिकासूत्र', असंगचे 'महायान सूत्रालंकार' आणि वसूबंधूचे 'अभिधम्म कोश' हे महत्त्वाचे बौद्ध ग्रंथ आहेत. 'बुद्धचरित्र' आणि 'सुंदरानंद'चा लेखक अश्वघोष हा सम्राट कनिष्काचा समकालीन होता. बौद्ध साहित्यामुळे सम्राट अशोक, कनिष्क, पुष्यमित्रशुंग, चंदगुप्त मौर्य इ.राज्यकर्त्याच्या इतिहासावर प्रकाश पडतो.जातक कथांमधून गौतम बुद्धाच्या जन्मापूर्वीची भारतातील सामाजिक स्थिती फजण्यास मदत होते. आजतागायत ५४९ जातक कथा प्रकाशित झाल्या आहेत. त्यातून भारताच्या इ.स. पूर्व तिसऱ्या व दुसऱ्या शतकातील राजकिय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीवर पर्याप्त प्रकाश पडतो.

**जैन साहित्य:**

जैन साहित्यात हेमचंद्र सूरीचा 'परिशिष्ट पर्व ' हा ग्रंथ मौलिक आहे. भद्रबाहूच्या लिखाणातून चंद्रगुप्त मौर्याचा इतिहास समजण्यास मदत होते. या शिवाय 'कथा कोश' 'कलीकापुराण' 'लोक विभाग' हे महत्त्वाचे ऐतिहासिक ग्रंथ आहेत. जैन धर्माचे अंग आणि उपांग हे महत्त्वाचे धार्मिक ग्रंथ असले तरी त्यातही काही महत्त्वाचे ऐतिहासिक संदर्भ आहेत. जैन वाङ्मय हे प्राकृत भाषेत असून ते अंतिमतः सहाव्या शतकात गुजराथमधील वल्लभी येथे संकलीत केले गेले. त्यावरून महावीरकालीन बिहार व पूर्व उत्तर भारताच्या राजकीय परिस्थितीवर प्रकाश पडतो.

**निधर्मी साहित्य:**

या कालखण्डात निधर्मी साहित्याची मोठ्या प्रमाणात रचना झाली. हे साहित्य कायदयासंबंधी असून त्याला धर्मसूत्र व स्मृतिग्रंथ म्हणतात. धर्मसूत्र, स्मृतिग्रंथ व त्यावरील टीकाग्रंथ या सर्वांना मिळून धर्मशास्त्र म्हणतात. धर्मसूत्र इ.स.पू. ५०० ते इ.स.पू. २०० या कालखण्डात संकलीत केले गेले तर महत्त्वाच्या स्मृतिग्रंथांचे संहितीकरण इ.स.च्या पहिल्या सहा शतकात झाले. यात राजा, त्याचे अधिकारी व निरनिराळ्या वर्णाच्या कर्तव्यांची चर्चा आहे. संपती, तिचा वारसा, विक्री या विषयीच्या नियमांची यात चर्चा असून चोरी, घातक हल्ला, खून, व्यभिचार इ. अपराधांसाठी करण्यात आलेल्या शिक्षेच्या तरतुदीची यात सविस्तर माहिती आहे.प्राचीन भारतात धर्मसूत्रावर लिहिण्यात आलेला अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथाचे १५ विभाग असून दुसरा व तिसरा विभाग सर्वात आधी रचला गेला असावा. हे दोन्ही भाग वेगवेगळ्या लेखकाची रचना असावी. या ग्रंथाचे अंतिम संकलन इ.स.च्या सुरूवातीला झाले असले तरी या ग्रंथाचा जो भाग सर्वात आधी रचला गेला, त्यात मौर्यकाळातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीची माहिती देण्यात आली आहे. प्राचीन भारतातील शासनपद्धती आणि अर्थव्यवस्था जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ अत्यंत उपयोगी आहे.भास, शूद्रक, कालिदास, बाणभट यांच्या अजरामर कलाकृतींतून ते ज्या काळात वावरत होते, त्या काळातील परिस्थितीवर उत्तम प्रकाश टाकण्यात आला आहे. कालिदास हा महान कवी व नाटककार होता. 'अभिज्ञानशाकुंतलम' हे त्याचे नाटक संस्कृत साहित्याचा मेरुमणी असून कालिदासाच्या असाधारण प्रतिभेचे ते नितांत सुंदर उदाहरण आहे. यात उत्तर व मध्य भारताच्या गुप्तकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यात आला आहे.बाण चे 'हर्षचरित्र', बिल्हणचे 'विक्रमदेवचरित्र', चांदबरदाईचे 'पृथ्वीराजरासो' इ. चरित्रात्मक ग्रंथ व कल्हणच्या राजतरंगिणी या काश्मीरसंबंधीच्या ग्रंथावरून तत्कालीन इतिहास समजण्यास मदत होते.पाणीनीचा 'अष्टाध्यायी' हा मौर्याच्या इतिहासाची तर पतंजलीचा 'महाभाष्य' भारतातील ग्रीक आक्रमणांची माहिती देतो. विशाखादत्तच्या 'मुद्राराक्षस' नाटकात चंद्रगुप्त मौर्यानि नंदांचा कसा नायनाट केला तर कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकात पुष्यमित्र आणि ग्रीक यांच्यातील युद्धांचे वर्णन आहे. कालिदासाच्या 'रघुवंशी' नाटकातील रघु हा एक तर समुद्रगुप्त किंवा चंद्रगुप्त द्वितीय असावा.

**परकीयांचे इतिवृत्त:**

प्राचीन भारतात ग्रीक, रोमन, चिनी लोक एक तर प्रवासी म्हणून नाही तर धर्मप्रसारक म्हणून आले. त्यांनी भारत भेटीत जे पाहिले त्याचा सविस्तर वृत्तांत लिहून ठेवला आहे. त्यामुळे अलेक्झांडरच्या भारतावरील स्वारीविषयी व त्याच्या भारतातील विजयांसाठी सर्वस्वी ग्रीक साधनांवर अवलंबून राहावे लागते.ग्रीक प्रवासी अलेक्झांडरचा समकालीन सॅण्ड्रोकोटसचा उल्लेख करतात. हा सॅण्ड्रोकोटस म्हणजे चंद्रगुप्त मौर्य होय. इ.स.पू. ३२२ ही त्याची राज्यारोहण तिथी होय. ग्रीक प्रवाशांच्या या उल्लेखामुळे प्राचीन भारतीय इतिहासाचा कालानुक्रम ठरविण्यास मदत होते. मेगॅस्थनिस हा सेल्युकस निकेटरचा चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारातील राजदूत होता. त्याने 'इंडिका' नावाचा ग्रंथ लिहिला. इंडिका आज मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. परंतु ग्रीक लेखकांच्या ग्रंथांत त्याचा अधूनमधून उल्लेख येतो. निरनिराळ्या ग्रीक लेखकांच्या लिखाणातील हे उल्लेख एकत्र केले तर मौर्यकालीन प्रशासन, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यावर भरपूर प्रकाश पडतो.इ.स. च्या पहिल्या आणि दुसऱ्या शतकातील ग्रीक आणि रोमन ग्रंथात भारतातील बंदरे आणि भारत व रोम यांच्यात चालणाऱ्या निरनिराळ्या वस्तूंच्या व्यापाराचा उल्लेख येतो.'पेरीप्लस ऑफ दि एरिथ्रिन सी' आणि टॉलेमीच्या 'जिऑग्राफी ' या ग्रीक भाषेतील ग्रंथात जी माहिती मिळते त्यावरून प्राचीन भारताच्या भूगोल व व्यापाराच्या अभ्यासास मोलाची मदत होते.पहिला ग्रंथ हा इ.स.८० ते ११५ व दुसरा ग्रंथ इ.स. १५० च्या सुमारास लिहिला गेला. इ.स. च्या पहिल्या शतकात लिहिण्यात आलेल्या प्लिनीच्या लॅटिन भाषेतील 'नॅशरलीस हिस्टोरिया' या ग्रंथातून भारत व इटली दरम्यान चालणाऱ्या व्यापाराची माहिती मिळते.भारतात जे चिनी प्रवासी आले. त्यात फाह्यान आणि ह्यूएनत्संग यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. हे दोघेही प्रवासी बौद्ध धर्मीय असून ते भारतात बौद्ध धर्माच्या पवित्र स्थानांना भेटी देण्यासाठी तसेच बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आले होते. त्यापैकी फाह्यान हा इ.स. च्या पाचव्या

शतकाच्या सुरवातीला तर ह्यूएनत्संग हा सातव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकाच्या दुसऱ्या चरणात आला होता. फाह्यानच्या इतिवृत्तातून गुप्तकाळतील सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनाची माहिती मिळते तर ह्यूएनत्संगच्या प्रवासवर्णनातून हर्षवर्धनच्या काळातील सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनावर प्रकाश पडतो.अशा रीतीने इतिहासाच्या निरनिराळ्या साधनांमुळे प्राचीन भारताचा इतिहास समजण्यास बरीच मदत इतिहास संशोधक व अभ्यासकांना झाली.

## इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण

गतक्षणापासून ते लक्षावधी वर्षांपूर्वीपर्यंतच्या मानवी वाटचालीचा आलेख इतिहासशास्त्रात रेखाटला जातो. ही गतकाळातील वाटचाल कशी झाली याचा अभ्यास इतिहासात होतो. भूतकाळात घडून गेलेल्या घटना कशा घडल्या असतील? होऊन गेलेल्या महान विभूती कशा जगल्या असतील? त्यांचे कार्य कसे साकारले असेल? तत्कालीन समाजजीवन कसे असेल? त्या समाजाची अभिव्यक्ती कशी साकारली असेल? असे एक नाही अनेक प्रश्न इतिहासाच्या अभ्यासात निर्माण होतात. या प्रश्नांची उत्तरे इतिहासकार शोधीत असतो. या प्रश्नांची उत्तरे शोधताना इतिहासकाराला घटना कशा घडल्या असतील याचे धोगेदोरे शोधावे लागतात. पुरावे शोधावे लागतात. त्या पुराव्यांची विश्वसनीयता तपासावी लागते त्यानंतर नेमकी घटना कशी घडली असेल याचे आधारभूत सत्य चित्र रेखाटले जाते.

गतकाळातील घटनांचे, वाटचालीचे, समाजजीवनाचे, संस्कृतीचे, कला अभिव्यक्तीचे असंख्य धोगेदोरे, पुरावे याच मातीत रुतून बसलेले असतात. हे पुरावे, या गतकाळाच्या पाउलखुणा म्हणजेच इतिहासाची साधने होत. ही साधने याच मातीत इतस्ततः विखरून पडलेली असतात. त्यांचा आवर्जून शोध घ्यावा लागतो. हा शोध घेणे म्हणजेच एक तंत्र आहे. एक पद्धत आहे. साधं उदाहरण घेता येईल. अगदी अलीकडच्या भूतकाळात म्हणजे कालपरवा, पंधरा वीस दिवसांपूर्वी किंवा काही महिन्यांपूर्वी घडलेली एखादी घटना प्रकाशात येते. पोलीस यंत्रणा जागी होते व त्या घटनेचा शोध घेतला जातो. घटना कशी घडली असेल याचा माग काढला जातो. घटनेशी संबंधित कोण असेल हे शोधले जाते. आणि हा शोध जो घेतला जातो तो घटनास्थळी किंवा आजूबाजूला आढळलेल्या पुराव्यांच्या आधारे. हे पुरावे म्हणजे भूतकाळात घडलेल्या घटनांची साधने होत. अगदी अलीकडच्या काळात एखादा खून झाला असेल, दरोडा पडला असेल, एखादी चोरी झाली असेल तर त्याचा शोध पोलीस घेतात. हा शोध घेताना ते घटनास्थळी सापडणाऱ्या वस्तू आधी ताब्यात घेतात. कारण या वस्तू म्हणजे चोरीसाठी वापरलेले अवजार, खुनासाठी वापरलेले शस्त्र त्या ठिकाणी गुन्हेगाराचा माग काढता येईल अशी गुन्हेगाराची एखादी खूण म्हणजे मागे राहिलेला धागादोरा, हे सर्व घटनांचेच पुरावे असतात. तसेच घटना घडत असताना ती कुणी पाहिली का ? याचाही शोध घेतला जातो. घटना पाहणारी व्यक्ती, तिचा जाबजवाब घटनास्थळी सापडलेले पुरावे या सगळ्या गोष्टी घटनेविषयी माहिती देणारी प्रथम दर्जाची अव्वल साधने मानली जातात. अशी साधने दोन प्रकारची असतात. काही लिखित पुरावे असतात तर काही प्रमाणात वस्तुरूप पुरावा. या पुराव्या आधारे पोलीस यंत्रणा घटनेतील सत्याचा शोध घेते व गुन्हेगाराला शोधून काढते.

इतिहासातही घटनेचा असाच माग काढावा लागतो आणि ही घटना अलीकडच्या भूतकाळातील असते, तशीच ती हजारो, लक्षावधी वर्षांपूर्वीची असते. घटनेचा हा शोध घेताना इतिहासकारही अशाच पुराव्यांचा शोध घेतो. घटनेतले सत्य त्यालाही शोधायचे असते व हे सत्य घटनेतील समकालीन घटकांतूनच, समकालीन पुराव्यांच्या आधारेच शोधता येते.

**साधनांचे वर्गीकरण म्हणजे काय ?**

लक्षावधी वर्षांच्या वाटचालीतील असंख्य पाउलखुणा याच मातीतून पुराव्यांच्या रूपाने सापडतात. अक्षरशः शेकडो साधने असतात. एखाद्या ठिकाणी जेव्हा उत्खनन केले जाते, तेव्हा त्या उत्खननातून सापडलेली साधनेदेखील अनेक कालखंडातील, अनेक प्रकारची असतात. त्या साधनांची विभागणी काही निकष ठरवून केल्याशिवाय त्यांचा योग्य तो उपयोग करणे कठीण असते. हजारो वर्षांच्या कालखंडातीलही अनेक प्रकारची साधने उपलब्ध होतात. ही साधने कधी घटना घडली त्या काळातली असतात, तर कधी कधी घटना घडून गेल्यानंतर काही शतकानंतरचीही असू

शकतात. त्या साधनांचे मोल साधनांच्या स्वरूपावर ठरते. कोणत्या काळातला पुरावा आहे हा जसा साधनांच्या अभ्यासाला एक निकष असतो तसाच साधनांचे प्रत्यक्ष स्वरूप हाही एक निकष आहे. उपलब्ध झालेली साधने वस्तुरूप असतात अस्थिरूप असतात. वस्तुरूप किंवा कलात्मक अभिव्यक्तिरूप असतात किंवा लिखित स्वरूपातली असतात. या साधनांची गटवार विभागणी म्हणजे साधनांचे वर्गीकरण होय. हे वर्गीकरण प्रामुख्याने तीन पद्धतींनी केले जाते. एका पद्धतीत साधनांच्या निर्मितीचा काळ ध्यानी घेऊन त्याचे वर्गीकरण केले जाते. दुसऱ्या पद्धतीत लिखित साधनांचा मथितार्थ ध्यानी घेऊन वर्गीकरण केले जाते. लिखित साधनांचा आशय लक्षात घेतला जातो. तिसऱ्या पद्धतीत साधनांच्या निर्मितीमागचा उद्देश ध्यानी घेऊन वर्गीकरण केले जाते.

या वर्गीकरणामुळे इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करणे, त्यांचा नेमका उपयोग करून वस्तुनिष्ठ असे इतिहासलेखन करणे शक्य होते. किंबहुना त्यासाठीच साधनांचे वर्गीकरण करावयाचे असते हे ध्यानी घ्यावे. साधनांची विश्वसनीयता, विश्वासार्हता जोखणे वर्गीकरणामुळेच शक्य होते. समकालीन अशी प्राथमिक दर्जाची साधने नेहमीच विश्वसनीय ठरतात. वर्गीकरणामुळे इतिहास साधनांचा योग्य तो उपयोग करणे शक्य होते.

**प्रथम दर्जाची साधने -**

घटना घडत असताना निर्माण झालेली साधने ही प्रथम दर्जाची साधने मानली जातात. भूमिपूजनाचा किंवा इमारतीच्या, धरणाच्या, पुलाच्या किंवा एखाद्या नव्या मार्गाच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम होतो तेव्हा त्याच वेळी ही घटना नोंदवणारा दगड तिथे बसवला जातो. हा भूमिपूजनाची नोंद असलेला दगड उद्‌घाटनाची नोंद करणारा इतिहासाचा प्रथम दर्जाचा पुरावा होय. एखाद्या महापुरुषाच्या समक्षच त्याच्या हयातीतीच त्याचे चरित्र नोंदवले जाते. हे चरित्र समकालीन पुरावा म्हणून प्रथम दर्जाचे साधन ठरते. कवींद्र परमानंदाने लिहिलेले शिवचरित्र, बाणभट्टाचे हर्षचरित, गुलबदन बानू बेगमेने लिहिलेला हुमायुननामा, किंवा अबुल फजलने लिहिलेला अकबरनामा ही सगळी प्रथम दर्जाची साधने ठरावीत. प्राचीन काळातील शिलालेख हे असेच प्रथम दर्जाचे ठरतात सम्राट अशोकाने त्याच्या हयातीतच निरनिराळ्या प्रसंगी शिलालेख कोरून ठेवले. हरिसेनाने समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे वर्णन त्याच काळात अलाहाबादच्या स्तंभलेखावर लिहून ठेवले. चालुक्य, राष्ट्रकूट, यादव नृपतींनीदेखील अनेक मंदिरांना भेटी दिल्या. तेव्हा त्या भेटीच्या नोंदी करणारे शिलालेख कोरले गेले. असे अनेक शिलालेख महाराष्ट्रात कोल्हापूर, नाशिक, अंबरनाथ, कंधार, होट्टल, अंबेजोगाई, अर्धापूर, सगरोळी या ठिकाणी सापडले आहेत. ही सर्व प्रथम दर्जाची साधने होत. नाणी, शिलालेख, उत्खनन अवशेष, स्थापत्य अवशेष, कला अवशेष यांचाही समावेश प्रथम दर्जाच्या साधनांमध्येच करावा लागेल.

कागद वापरात आल्यानंतर राजदरबारातील असंख्य कागदपत्रेही उपलब्ध होऊ लागली. प्रथम दर्जाच्या साधनांचे स्वरूपही बदलले. कागदपत्रांपेक्षाही अधिक विश्वसनीय असे छायाचित्र आधुनिक काळात उपलब्ध होऊ लागले. छायाचित्र हे अलीकडच्या इतिहासाचे प्रथम दर्जाचे साधन मानावे लागेल. आता तर व्हिडीओ शुटिंगमुळे नेमका प्रसंग कसा घडला याचे जिवंत चित्रणच उपलब्ध होऊ लागले आहे. हे जिवंत चित्रणही प्रथम दर्जाचे साधनच आहे. या चित्रणाच्या आधारे, चलचित्राच्या आधारे व बोलपटाच्या आधारे गेल्या शंभर दीडशे वर्षातल्या अनेक व्यक्तिरेखा जशाच्या तशा आपल्यापर्यंत पोहोचल्या आहेत. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस यांच्या विषयी माहिती देणारी चलचित्रे नेमकी काय चर्चा" झाली याची प्रत्यक्ष नोंद रिकार्डींगच्या स्वरूपात ठेवली जाते. ही प्रथम दर्जाची साधने होत. एखाद्या प्रसंगी साधनांचे स्वरूप बदलत चालले आहे व ती साधने अधिकाधिक विश्वसनीय बनत चालली आहेत, हे या रेकार्ड-टेप्स सूचित करतात.

प्रथम दर्जाच्या साधनांना इतिहास लेखनात अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते कारण १) ही साधने समकालीन असतात. २) समकालीनत्वामुळे ती अधिक विश्वसनीय ठरतात. ३) घटना घडत असताना ती साधने निर्माण झाल्यामुळे त्यात वास्तवाचा विपर्यास असण्याची शक्यता कमी असते. ४) घटनांच्या खऱ्याखुऱ्या नोंदी त्यात आढळतात. ५) ही साधने प्रत्यक्ष पुराव्याच्या स्वरूपातली असल्यामुळे गतकाळातील घटनांमधील सत्य-शोधनाच्या प्रयत्नात अधिक उपयुक्त ठरतात. ६) प्रथम दर्जाच्या साधनांपैकी शिलालेख, ताम्रपटांमध्ये तर खाडाखोड, दुरुस्ती शक्य नसते. म्हणजेच या साधनांचा पुराव्यांचा गैरवापर शक्य नसतो. नेमके गतकाळातील सत्य हाती लागते. शिलालेखांमधील शब्द

दगडावरची रेघ असते ती पुसता येत नाही. तात्पर्य या सर्व गोष्टींमुळे प्रथम दर्जाच्या साधनांना इतिहास लेखनात आगळे स्थान प्राप्त झाले आहे, हे लक्षात घ्यावे.

**दुय्यम दर्जाची साधने -**

घटना घडून गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून तरी माहिती ऐकली जाते, ती नोंदवली जाते. ही नोंद दुय्यम दर्जाचा पुरावा ठरतो. घटना घडत असताना नोंदवलेल्या नोंदीपेक्षा या नोंदीत फरक असण्याची, सत्याचा अपलाप असण्याची, माहिती अपुरी वे विपर्यस्त असण्याची शक्यता असते. म्हणूनच त्याला दुय्यम दर्जाचे साधन मानायचे. घटना घडून गेल्यानंतर जसजसा काळ जातो तसतशा घटना विस्मृतीत जातात. काही महत्त्वाचे घटक, उल्लेखनीय गोष्ट, वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग तेवढे ध्यानात राहतात. ते एकमेकाला सांगितले जातात. क्वचित प्रसंगी असा एखादा ऐकणारा माणूस ही नोंद लिखित स्वरूपात करून ठेवतो. या नोंदीत अनेक तपशील गळाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या नोंद करणाऱ्याने प्रसंग स्वतः पाहिलेला नसतो. कुणाकडून तरी ऐकलेला असतो त्यामुळे है घडणे अपरिहार्य ठरते. हाती आलेल्या माहितीच्या आधारे त्याने काही निष्कर्ष काढलेले असतात. त्यात काही प्रमाणात सत्य असतेही; परंतु सत्याचा अपलापही असू शकतो. अशी दुय्यम दर्जाची साधने प्रामुख्याने लिखित स्वरूपाची असतात. मग ते एखाद्या महामानवाचे चरित्र असेल, एखादी कादंबरी असेल, नाटक असेल किंवा गतकाळातील घटनांच्या स्मृतींच्या आधारावर विशाखादत्ताने रचलेले मुद्राराक्षसासारखे नाटक असेल हेही दुय्यम दर्जाचे साधन ठरावे. कालिदासाची नाटके ही अशीच दुय्यम दर्जाची साधने होत. मराठ्यांच्या इतिहासावरील बखरीचे स्वरूपही असेच दुय्यम दर्जाचे मानले जाते.

आजच्या वर्तमानपत्रांतील वर्षा अखेर येणाऱ्या घटनांच्या नोंदी किंवा घडून गेलेल्या घटनांबद्दलची पत्रकारांची प्रतिक्रिया, एवढेच काय वृत्तपत्रांतील बातम्यादेखील कित्येकदा दुय्यम दर्जाची साधनेच ठरतात. फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल दैनंदिन घटनांची बातमीपत्रे पाठविणाऱ्या एका फ्रेंच पत्रकाराची एक डायरी अलीकडेच प्रकाशित झाली. पॅरीस शहरातल्या घटनांच्या नोंदी त्याने कशा पाठविल्या याचे धक्कादायक चित्र या डायरीतून स्पष्ट झाले. तात्पर्य पत्रकारांच्या नोंदीनाही दुय्यम साधनांचे स्थान द्यावे लागते.

कित्येकदा दुय्यम दर्जाच्या साधनांनाही प्रथम दर्जाचे महत्त्व प्राप्त होते. जेव्हा प्रथम दर्जाचे साधन उपलब्ध नसते तेव्हा ही दुय्यम दर्जाची नोंदही उल्लेखनीय ठरते. अश्वघोषाने लिहिलेले सिद्धार्थ गौतम बुद्धाचे चरित्र हे बुद्धाच्या हयातीत लिहिले गेलेले नसले, त्यानंतर काही शतकांनी ते रचिलेले असले तरी ते प्रथम दर्जाचे साधन मानले जाते, कारण इतकी सविस्तर विश्वसनीय नोंद यापूर्वी झालेली नसते. तद्वतच मूळ हस्तलिखितरूप ग्रंथाची संहिता प्रकाशित करणारा छापील ग्रंथही छापील असूनही प्रथम दर्जाच्या साधनाचे महत्त्व धारण करतो. मग ती ऋग्वेदाची संहिता असो की पुराणग्रंथाची किंवा ज्ञानेश्वरीची मूळ संहिता असलेला छापील ग्रंथ असो तो महत्त्वपूर्ण साधन असतोच.

तात्पर्य असे की दुय्यम दर्जाची साधने जशी हस्तलिखित कागदपत्रांच्या स्वरूपात असतात, तशी छापील ग्रंथाच्या स्वरूपातही ती असतात. त्यामुळे हस्तलिखितावर आधारित विवेचनात्मक, स्पष्टीकरणात्मक व वर्णनात्मक लिखाण हे दुय्यम साधन ठरते. गतकाळात होऊन गेलेल्या व्यक्तींची आज प्रकाशित झालेली चरित्रे, गतकाळात घडलेल्या घटनांचे वर्णन, विश्लेषण करणारा आजचा प्रकाशित ग्रंथ हा तसा दुय्यम साधनच ठरतो. संशोधकाने दुय्यम साधनांचा वापर करताना त्याची विश्वसनीयता तपासणे अगत्याचे असते. प्रथम दर्जाच्या साधनांच्या तुलनेत त्याची विश्वसनीयता साहजिकच कमी असणार. म्हणूनच प्रथम दर्जाच्या साधनांशी पडताळणी करून मगच दुय्यम दर्जाच्या साधनांचे परीक्षण करावे लागते.

इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करण्याच्या दुसऱ्या पद्धतीत लिखित साधनांचा आशय लक्षात घेऊन साधनांची विभागणी केली जाते. कागद वापरात आल्यापासून निरनिराळ्या प्रकारची लिखित साधने उपलब्ध होऊ लागली. या लिखित साधनांचे संकलन, संशोधन पुरोभिलेख संग्रहालयातून केले जाऊ लागले. असंख्य प्रकारची कागदपत्रे उपलब्ध झाली. वर्गीकरणामुळे या कागदपत्रांचा अभ्यास करणे अधिक सुलभ झाले. आशय लक्षात घेऊन उपलब्ध कागदपत्रीय पुरावा कितपत वास्तव आणि विश्वसनीय आहे याचे भान इतिहास-संशोधकाला ठेवावे लागते.

व्यक्तिगत पत्रव्यवहारातून, चरित्रग्रंथात्मक लिखाणातूनही ऐतिहासिक सत्य गवसते तसे ते वाङ्मयीन अभिव्यक्तीतूनही सापडते, पण कथा कादंबरीतून असलेल्या कल्पनाविलासात, अतिशयोक्तीत ते ऐतिहासिक सत्य धूसर झालेले असते. कथा आणि कादंबरी या साधनांचा अभ्यास करताना इतिहासाच्या अभ्यासकाला हे भान ठेवणे अगत्याचे असते. राजदरबारातील कागदपत्रे, सरकारी दस्तऐवजे या साधन प्रकारांचा उपयोग गतकालीन वाटचालीतील राजकीय घडामोडींचा अभ्यास करताना निश्चितच मोठ्या प्रमाणात होतो. तेथेही कागदपत्रांची अस्सलता जोखावी लागतेच. कागदपत्रे बनावट तर नाहीत ना हे तपासण्याची काळजी अभ्यासकाला घेणे अगत्याचे असते. तात्पर्य, आशयाधारित वर्गीकरण केल्याने साधनांचा अभ्यास अधिक सुलभतेने करता येतो.

तिसऱ्या वर्गीकरण पद्धतीत पुरातत्त्वीय साधनांचे वर्गीकरण केले जाते. वस्तुरूप साधने जेव्हा सापडतात तेव्हा त्या वस्तूंचे स्वरूप तसेच वस्तूच्या निर्मितीमागचा उद्देश ध्यानी घेतला जातो. इतिहासपूर्व काळातील मानवाच्या वापरात असलेली हत्यारे कोणत्या उद्देशाने तयार झाली होती या प्रश्नाचे उत्तर साहजिकच त्या काळातल्या मांसाहारी रानटी माणसाच्या शिकारी प्रवृत्तीत शोधावे लागते. अशी शिकारीसाठीची हत्यारे, इतर वस्तू यांची वर्गवारी करून एक गट पाडला जातो. तसेच उत्खननात स्थापत्य अवशेषही सापडतात. त्या स्थापत्य अवशेषांच्या निर्मितीमागचा उद्देश ध्यानी घेऊन तो अवशेष अभ्यासणे अधिक सोयीचे ठरते. ते बांधकाम करताना घर बांधण्याचा त्यांचा उद्देश होता, म्हणजे ते घर आहे की गोदाम आहे की स्नानगृह आहे की मंदिर आहे याचा बोध होतो. अशा अवशेषांचे वर्गीकरण करून अभ्यास केला जातो. असाच लेण्यांचा, मंदिरांचा, शिल्पांचा, ब्रांझ किंवा इतर धातू मूर्तीचाही वर्गीकृत अभ्यास वा संशोधन करणे सोयीचे ठरते. लेणी कोरताना चैत्यगृह कोरण्याचा उद्देश होता की विहार कोरण्याचा हे ध्यानी घेऊनच लेणीस्थापत्य विशारद विशिष्ट साधनांचा अभ्यास करीत असतात. याच पद्धतीतून मिथुन शिल्पांचा, चित्रकलेचा, मंदिरशैलींचा व शिखर पद्धतींचा अभ्यास होतो.

तात्पर्य, इतिहासाच्या साधनांचे असे वर्गीकरण केले जाते. या सर्वच प्रकारच्या साधनांचा अभ्यास वरील पद्धतींनी वर्गीकरण केलेल्या साधनांचा उपयोग इतिहास संशोधकाला गतकालीन वाटचाल रेखाटताना करावा लागतो. इतिहासपूर्वकाळाच्या संदर्भात उद्देशाधारित वर्गीकरण उपयुक्त ठरते तर प्राचीन आणि मध्ययुगीन काळाच्या संदर्भात आशयाधारित वर्गीकरणाचा उपयोग होतो. निर्मितीचा काळ ध्यानी घेऊन केलेले वर्गीकरण तर एकूण इतिहास संशोधन लेखन-प्रक्रियेत नेहमीच उपयुक्त ठरते. समकालीन पुरावा, प्रत्यक्षदर्शी पुरावा इतिहासात विश्वसनीय ठरतो. दुय्यम पुराव्यातून इतर तपशील हाती येतात. ते सारे विचारात घेऊन इतिहासलेखन करावे लागते हे ध्यानी घेणे अगत्याचे आहे.

**आधुनिक इतिहासाची साधने, आणखी एक वर्गीकरण -**

वरील तीन प्रकारच्या वर्गीकरणाशिवाय आधुनिक इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करताना आणखी एक वर्गवारी करावी लागते. आधुनिक इतिहासाची वाटचाल धुंडाळताना, उत्खनने, कार्बन १४ ची रासायनिक प्रक्रिया, अस्थीअवशेष, खापरे, नाणी, शिलालेख, ताम्रपट यांसारखे पुरातत्त्वीय पुरावे किंवा करीने, तवारिखा, बखरी, चरित्रे, काव्ये, महाकाव्ये, पुराणे स्थानपोथ्या असे पुराभिलेखीय पुरावे उपयोगी ठरत नाहीत, तर १९ व्या आणि २० व्या शतकातील वाटचाल रेखाटताना अगदी वेगळ्या प्रकारचे पुरावे धुंडाळावे लागतात. या पुराव्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

१५ व्या शकाच्या अखेरीस पाश्चात्त्य जगात आधुनिक युग अवतरले आणि सर्वच क्षेत्रात प्रचंड स्थित्यंतर घडून येण्याची प्रक्रिया सुरू झाली. औद्योगिक क्रांती, छपाई यंत्राचा शोध, वाफेच्या इंजिनाचा शोध, त्यातून सुरू झालेले यांत्रिकी उत्पादन, कच्च्या मालाची गरज, तयार मालासाठी बाजारपेठ आणि भांडवलशाही, वसाहतवादी, साम्राज्यवादी विस्तार या प्रक्रियांतून सारे जग आमूलाग्र बदलत गेले. बदलत्या

जगाच्या वाटचालीतल्या पाउलखुणांचे स्वरूपही बदलत गेले. साधनांचे, पुराव्यांचे स्वरूपही बदलले. हस्तलिखित कागदपत्रांच्या जागी आता छापील, प्रकाशित मजकूर उपलब्ध होऊ लागला. शिलालेख आणि ताम्रपटांच्या जागी आता सरकारी गॅझेट सूचनापत्रं टंकलिखित किंवा प्रकाशित स्वरूपात येऊ लागली. बदलत्या जगाची चाहूल आपल्याकडेही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लागली. आपल्याकडेही प्रचंड स्थित्यंतरे घडून आली.

इतिहासाच्या साधनांचे स्वरूप पूर्णपणे बदलून गेले आहे. मूळ कागदपत्रं तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयातील रेकार्डरूम-मध्ये आणि केंद्रीय व राज्य पुराभिलेखागारात संग्रहित ठेवण्यात आली. त्यांना अजूनही दुर्मिळ हस्तलिखितांइतकेच महत्त्व आहे. पण या कागदपत्रांचे रूप आता हस्तलिखित करीने, तवारिखा, शकावल्या किंवा आज्ञापत्रासांरखे नाही. शिवकाळाच्या किंवा नंतरच्या शतकाच्या इतिहासात उपलब्ध नव्हते असे एक नवे साधन वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या स्वरूपात एकोणिसाव्या शतकापासून उपलब्ध झाले आहे. आधुनिक इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे वृत्तपत्रे आणि नियतकालिके होत. आधुनिक काळात आता पूर्वीसारखे म्हणजे प्राचीन आणि मध्ययुगीन काळासारखे शिलालेख किंवा ताम्रपट कोरले जात नाहीत, तरीही शिलालेखातल्या सारख्या काही महत्त्वपूर्ण नोंदी आजही दगडावर केल्या जातात. भूमिपूजनाचे दगड, स्मृतिस्तंभ, पुतळ्यांच्या चौथऱ्यावरच्या नोंदी या शिलालेख स्वरूपच असतात. हे आधुनिक काळातले शिलालेख होत.

आजही तुरळक का होईना, ताम्रपट दिले जातात. स्वातंत्र्य सैनिकांना दिलेली सन्मानपत्रे अशा ताम्रपटाच्या स्वरूपातच आहेत. काही ठिकाणी मानपत्र देतानाही ताम्रपटाच्या स्वरूपात दिली जातात. परंतु पूर्वीसारखे त्या ताम्रपटांना आज महत्त्व उरलेले नाही हे निश्चित. आज इतिहासाचे साधन म्हणून ध्वनिफिती, चलचित्रफिती उपलब्ध होताहेत. वर्तमानात घडून गेलेल्या घटनांचे, भ्रष्टाचाराचे पुरावेच आता तहलका डॉट कॉमच्या रूपात सादर होताहेत. २१ व्या शतकातील आधुनिक इतिहासाची साधने आता इंटरनेट वेबसाईट्स आणि कॉम्प्यूटर डिस्कचे रूप धारण करताहेत. छापील संदर्भ ग्रंथ, हेही इतिहासाचे साधन ठरते आहे. दुय्यम साधनांचे स्थान त्यांना दिले जाते एवढेच नव्हे तर गेल्या पन्नास पंचाहत्तर वर्षांतली वाटचाल ज्यांनी प्रत्यक्ष अनुभवली आहे अशांच्या मुलाखती हेही आधुनिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. सामाजिक शास्त्र संशोधन पद्धतीत या मुलाखतींचेही विशिष्ट तंत्र आणि निरनिराळ्या पद्धती वापरल्या जातात. इतिहासालाही त्या उपयुक्त ठरतात. छायाचित्रे हा तर आणखी एक विश्वसनीय पुरावा. आधुनिक इतिहासाच्या अभ्यासात छायाचित्रांच्या रूपात एक महत्त्वपूर्ण साधन वापरता येते. तात्पर्य, आधुनिक इतिहासाच्या साधनांचे स्वरूप पूर्णतः भिन्न असून त्याची वेगळीच वर्गवारी करावी लागते हे मात्र खरे!

**इतिहासाचे महत्त्व:**

आदिमानवाच्या काळापासून तो आजतागायत मानवी व्यवहारांचे एक निश्चित उद्दिष्ट राहिले आहे, ते म्हणजे मानवी जीवन अधिकाधिक सुखकर करणे. सुखी जीवनाचे दोन पैलू असतात- एक भौतिक जीवन आणि दुसरे आत्मिक. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीने भौतिक जीवन सुखी होते, तर लौकिक व्यावहारिक जीवन सुखी असण्यासाठी माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आवश्यक असतो व यासाठी इतिहास महत्त्वाचा ठरतो. इतिहास हा गतकालीन मानवी जीवनाचा आलेख आहे. मानवी जीवनाचा प्रवाह हा अखंडित वाहणारा प्रवाह आहे; त्यामुळे गतकाळ व वर्तमानकाळ यांचा अतुट संबंध असतो. दोहोत हवाबंद अगर अपारदर्शक रेषा काढता येत नाहीत. वर्तमानाची बीजे गतकाळात रुजलेली असतात. गतकाळाच्या आधारेच वर्तमानकाळ उभा असतो, त्यामुळे गतकाळातून वर्तमानाची कधी सुटका नसते. ह्या वास्तवाची जाणीव इतिहास करून देतो.

इतिहास हे एक भव्य ज्ञानभांडार आहे. गतकालीन मानवी जीवनाबाबतची माहिती इतिहासाद्वारे होते. रानटी अवस्थेपासून मानवाने क्रमाक्रमाने प्रगती कशी केली याची माहिती इतिहासातून मिळाली की उत्क्रांतीच्या तत्त्वाचा बोध होतो आणि मानवी जीवनाच्या उद्दिष्टाचाही अर्थबोध होतो. पूर्वीच्या लोकांनी केलेल्या प्रशंसनीय, साहसी कार्यातून प्रेरणा मिळते, चांगले कार्य करण्यास प्रोत्साहन मिळते, तर पूर्वी केलेल्या चुक्ता कळल्या की ते खाचखळगे कसे टाळायचे तेही कळते. इतिहास अशा प्रकार माणसाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतो. याच अथर्थाने "इतिहास न जाणणारा भाणूस पुन्हा पुन्हा त्याच चुका करीत राहातो" असे विधान प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सात्यांयन याने केलेले आढळते.

इतिहास म्हणजे समाजाचे अगर राष्ट्राचे स्मृतिभांडारही आहे. माणूस आपल्या स्मरणशक्तीच्या आधारे आपले अनुभवविश्व जतन करतो. समाजाच्या स्मरणशक्तीचे कार्य इतिहास करतो. 'पुढच्याला ठेच आणि मागचा शहाणा' ह्या न्यायाने इतिहासाचे अध्ययन करणाऱ्या व्यक्तीचे व समाजाचे ज्ञानभांडार समृद्ध व परिपक्व बनते, आणि अनुभवविश्व अप्रत्यक्षपणे समृद्ध बनते. रोमन सिनेटर सिसेरो याने ह्या संदभांत नोठे मार्मिक विधान केले आहे. तो म्हणतो, "ज्या

व्यक्तीला त्याच्या जन्मापूर्वी घडलेल्या गोष्टींचे ज्ञान नाही, त्याची चाल्यावस्था संपली नाही असे समजावे. (*To be ignorant of what happened before you were born, is to be ever a child.)* इतिहासाबाबत अज्ञानी असलेला समाज स्मृतिभ्रंश झालेल्या व्यक्तीप्रमाणे दिशाहीन, अस्मिताहीन जीवन जगतो.

इतिहासाचे अध्ययन माणसात विवेकी समतोल, सम्यक् दृष्टी निर्माण करते. मानवी जीवनातील चांगल्या-वाईट, इष्ट अनिष्ट गोष्टी कळल्यामुळे बुद्धी प्रगल्भ होते. मनोवृत्ती स्थिर होतात. मानवी व्यवहारांचे अर्थ अधिक स्पष्टपणे कळतात. "इतिहासाच्या अध्ययनाने माणसाच्या विचारांना व भावनांना स्थैर्य आणि सखोलता प्राप्त होते," असे बर्ट्रंड रसेल या तत्त्वचितकाने केलेले विधान लक्षणीय आहे. (*History is enormously important. Il gives stability and depth to thought and feelings.)* थॉमस मन्रो ह्या १९व्या शतकातील ब्रिटिश मुत्सद्याने देखील "इतिहासाची काही पृष्ठे सुद्धा मानवी मनाच्या व्यवहारांचे सम्यक आकलन करण्याची क्षमता निर्माण करण्यास पुरेशी ठरतात", असे म्हटले आहे.

वर्तमानकाळात प्रचलित असलेल्या अनेक विचारप्रवाहांचे मूळ गतकाळात आढळते. वसाहतवाद, व्यापारवाद, साम्राज्यवाद, जागतिकीकरण इत्यादी गहन वाटणाऱ्या सिद्धांतांचा उगम कसा व कोणत्या परिस्थितीत झाला, याची माहिती कळली की त्यांचे मर्मही सहजपणे ध्यानात येते. व्यक्तीपुढे, समाजापुढे अगर राष्ट्रापुढे उभ्या असलेल्या अनेक कठीण समस्यांची बीजे गतकाळात रुजलेली असतात. ती बीजे कशी व कोणत्या परिस्थितीत रुजली, कोणी व कां रुजविली याचे स्पष्टीकरण इतिहासाद्वारा मिळाले की त्यांचे निराकरण करणे सुकर होते. इतिहासातूनच, ज्यू समाज जगभर का विखुरला, त्यांच्यात व अरबांच्यात संघर्ष का निर्माण झाला, किंवा भारतात जमातवादाला खतपाणी कोणी घातले हे कळले तर त्याकडे पाहण्याची निकोप दृष्टी मिळते, अतिरेकी निर्णयाचा धोका टळतो. आणि आपल्या पुढील समस्यांना विवेकीपणे व आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची शक्ती मिळते. समस्या केवळ माझ्याच वाट्याला आलेल्या नाहीत, त्या पूर्वीही गतकाळात अनेकांनी अशाच समस्यांना तोंड दिले आहे ही जाणीव इतिहास निर्माण करतो. यामुळे माणसाची संकुचित, कूपमण्डुक वृत्ती नष्ट होऊन दृष्टी व्यापक बनते. इतिहासाच्या अध्ययनामुळे आजच्या काळातील जागतिक घडामोडींचे मर्महीं सहजपणे उलगडते. भारत-पाकिस्तान तणावाची मूळ कारणे ध्यानात येतात. इंग्लंडमधील लोकशाहीच्या विकासाचे मर्म कळते, आणि आज आतंकवादाविरुद्ध कंठशोष करीत दण्ड थोपटणाऱ्या अमेरिकेनेच पश्चिम आशियातच नव्हे तर जगभर मूल्यहीन राजनीतीला व आतंकवादाला कसे खतपाणी घातले या वर्तमानावर इतिहास प्रकाशझोत टाकतो. यामुळेच राजकीय मुत्सद्यांना इतिहासाचे अध्ययन आवश्यक ठरते. जिज्ञासा म्हणजे नवे ज्ञान प्राप्त करण्याची तीव्र इच्छा. ही मानवाची उपजत प्रवृत्ती आहे. माझे पूर्वज कसे राहत होते, त्यांची जीवनपद्धती काय होती हे जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक व्यक्तीला, समाजाला व राष्ट्राला असते. हा परिचय इतिहासाद्वारे होतो. त्यामुळे जिज्ञासा पूर्तीचा आनंद मिळतो. इतिहास गतकालीन संस्कृतीचा वारसा जपतो; त्याद्वारे प्राचीन संपन्न परंपरेची जाणीव करून देतो आणि अशा प्रकारे आत्मज्ञान देतो. हा विचारू आर.जी. कोलिंगवूड ह्या विसाव्या शतकातील इंग्रज इतिहासकाराने प्रभावीपणे मांडला आहे. आपल्या *Idea of History* ह्या ग्रंथात ते म्हणतात, "आत्मज्ञानासाठी इतिहास उपयुक्त आहे. इतिहास मौल्यवान आहे. त्याची शिकवण मानवी जीवनासाठी लाभदायक आहे." (*History is for human self-knowledge History has a value, its teachings are useful for human life.)* इतिहासाच्या शैक्षणिक मूल्यावर सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार व विचारवंत विल ड्यूरंट हे देखील विशेष भर देतात. ते म्हणतात, 'शिक्षण म्हणजे संस्कृतीचा वारसा पुढील पिढीच्या हाती देणे आणि यात इतिहास मोलाची भूमिका बजावतो.' *(Education is transmission of civilization and history plays a significant role in it)*. ह्याच संदर्भात आर्थर मार्विक यांचे "*We can not escape from history. Without the knowledge of history, man and society would run adrift, rudderless craft on the unchartered sea of time*" हे विधान लक्षणीय ठरते.

महत्त्वाचा मुद्दा असा की इतिहास शिकवण देतो ती रूक्ष, नीरस उपदेशपर मार्गाने नव्हे तर, जिवंत उदाहरणे वाचकांच्या पुढे मांडून इतिहास रंजक पद्धतीने अप्रत्यक्ष शिकवण देतो, त्यामुळे तो रटाळ वाटत नाही. लँगलोईस व सिनोबोस यांना मात्र इतिहासाचे उद्दिष्ट रंजनाचे नसून, किंवा धडे देण्याचे नसून "शुद्ध ज्ञान" देण्याचे आहे असे वाटते. तसेच इतिहास हा सर्वव्यापी, बहुआयामी विषय आहे. प्रत्येकच ज्ञानशाखेचा इतिहास असतो. केवळ मानव्य शास्त्रेच नाहीत, तर भौतिक शास्त्रे, वैद्यक शास्त्र, तंत्रज्ञानशाखा ह्या सर्वांना इतिहासाचा मार्ग आक्रमित पुढे जावे लागते. गतकालीन ज्ञानाच्या आधारावरच नवे प्रयोग करता येतात. विकासाचा पुढील टप्पा गाठता येतो. डॉक्टर देखील रोगाचे अंतिम निदान करण्यापूर्वी रुग्णाचा सर्व इतिहास व रोगाच्या पूर्वलक्षणांचा तपशील विचारत असतो. त्यावरून इतिहास ही केवळ एकाकी ज्ञानशाखा नसून ती एक अध्ययनाची पद्धती आहे असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरते.

याखेरीज व्यक्तीच्या अंगच्या अनेक उपजत सुप्त गुणांचा विकास घडविण्याचे श्रेय इतिहासाला द्यावे लागते. इतिहास ही बौद्धिक ज्ञानशाखा असल्याने ती बुद्धीचा योग्य वापर करायला शिकवते. तर्कनिष्ठा शिकवते. नवे ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा पूर्ण करताना इतिहास सत्यशोधनाची वृत्ती बाणवतो. भावनेच्या आहारी न जाता विवेक जागृत ठेऊन समतोलपणे व वस्तुनिष्ठ वृत्तीने निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करतो. कर्णोपकर्णी ऐकलेल्या गोष्टी खऱ्या नसतात. त्यांची सत्यासत्यता पारखून घेणे निकडीचे असते, नकळत पुराव्याशिवाय केलेले विधान अंगलट येऊ शकते, ह्या धोक्याची जाण इतिहासाच्या अध्ययनाने होते. तसेच जीवंत उदाहरणांद्वारा नैतिक मूल्यांचे, मानवी मूल्यांचे महत्त्व इतिहास गळी उतरवितो, आणि अशा रीतीने माणसाचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ व परिपक्व बनवितो. म्हणूनच फ्रान्सिस बेकन हा इंग्रज तत्त्वज्ञ 'इतिहास माणसाला सुज्ञ बनवितो' *(History makes men wise)* असे अर्थपूर्ण विधान करतो.

ह्यावरून इतिहासाचे अध्ययन अर्थहीन अगर निरुपयोगी नसून मानवी मन प्रगल्भ करण्यासाठी, त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी आणि एकूण जीवनाचा मार्ग सुखकर करण्यासाठी उपयुक्त व उपकारक ठरते. केवळ भौतिक प्रगती मानवी जीवन सुखकर करण्यास पुरेशी नसते. त्याला विवेकाची, संयमाची, सुज्ञपणाची जोड असावी लागते आणि याची जाण इतिहास करून देतो; यात 'इतिहासाचे अध्ययन कशासाठी? ह्या प्रश्नाचे तर सामावलेले आहे.

**इतिहासाचे दुरुपयोग**

इतिहासाचा गैरवापर हा एक महत्वाचा विषय आहे. यासंदर्भात मांडणी करण्यापूर्वी थोड्या मूलभूत संकल्पनांचा विचार करणं मला गरजेचं वाटतं. इतिहास आणि भूतकाळ या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ही बाब आपण बऱ्याचदा विसरतो. जे काही होऊन गेलेलं आहे त्या सगळ्याच गोष्टी भूतकाळामध्ये, गतकाळामध्ये येतात. पण जेव्हा कुणीतरी या घटना आठवणींमध्ये, स्मृतीमध्ये जतन करतं, आणि त्याच्या आधारानं सुसंगत इतिहासक्रमाची नोंद करतं तेव्हा भूतकाळाचा इतिहास बनतो. म्हणजे भूतकाळ हा जणू इतिहास या ज्ञानशाखेचा कच्चा माल आहे, आणि त्याच्यावर थोडी प्रक्रिया करणं गरजेचं असतं. घडलेल्या गोष्टी कोणीतरी महत्त्वाच्या आहेत असं मानून नोंदवल्या पाहिजेत आणि त्या नोंदवलेल्या गोष्टींचा वापर करून कोणीतरी त्या नोंदींच्या आधाराने इतिहासलेखन केलं पाहिजे.

हिरोडोटस या ग्रीक तत्त्ववेत्त्याने हिस्टरीज् (इ.स.पूर्व ४४०) हे पुस्तक लिहिलं. त्यामुळे इतिहास या ज्ञानशाखेची सुरुवात हिरोडोटसपासून झाली, असं मानलंजातं. 'हिस्टोरिया' या शब्दापासून संशोधन किंवा तपास - एखाद्या गोष्टीमध्ये खोलात जाऊन तपास करणे, चौकशी करणे, विचार करणे अशा अर्थाने 'हिस्ट्री' हा शब्द रूढ झालेला आपल्याला दिसतो. भारतीय भाषांकडे वळायचं झालं तर आपल्याकडे इति+ह+आस म्हणजे इतिहास असं म्हणतात. आणि ही शब्दरचना मला खूप महत्त्वाची वाटते. कारण 'इति' म्हणजे असं, 'ह' याचा अर्थ म्हणे किंवा असं सांगतात; आणि 'आस' म्हणजे होतं किंवा घडलं. म्हणजे 'इतिहास' याचा अर्थ झाला 'असं घडलं असं सांगतात. आपण मघाशी जी इतिहासाची व्याख्या पाहिली की काहीतरी घडणं आणि मग कुणीतरी ते सांगणं, नोंदवून ठेवणं, त्याची सुसंगत पुनर्रचना करणं, या दोनही पायऱ्या 'इतिहास' या शब्दामध्येच अभिप्रेत आहेत. जेव्हा आपण इतिहासाकडे ज्ञानशाखा म्हणून बघतो तेव्हा त्यामध्ये आपण चिकित्सक दृष्टीने काही गोष्टी कशा घडल्या? नक्की घडल्या की नाही?

सांगणारा कोण आहे? याची माहिती काढणं अभिप्रेत असतं. काय घडलं याची चिकित्सा किंवा चौकशी करणं, कोणी तरी ती माहिती सांगणं आणि आपण त्यावर प्रक्रिया करणं या एवढ्या सगळ्या गोष्टी इतिहास या शब्दातच अभिप्रेत असतात. या सगळ्यांचा वापर नक्की काय करायचा, इतिहास हा उपयुक्त विषय आहे असं कशासाठी मानायचं किंवा त्याची काही कार्य, उद्दिष्टं आहेत का? तर हो. इतिहासाला कार्य आणि उद्दिष्टं आहेत. एखादी गोष्ट घडली, त्या संदर्भातली माहिती मिळावी, असा माहितीपुरता एक उपयोग आपण मानू शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे इतिहासामधून काही एक बोध व्हावा, अशी अपेक्षा लोक ठेवत असतात. म्हणजे 'आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा।' अशी इतिहासामधून प्रेरणा घ्यावी आणि आपण त्यांच्यासारखं व्हावं किंवा असं करू नये किंवा असं करावं इत्यादी गोष्टींचा बोध घेणं, हे सुद्धा इतिहास या ज्ञानशाखेचं एक कार्य आहे. तिसरी गोष्ट म्हणजे इतिहासाला थेरपी किंवा उपचार मूल्य आहे. जखमांवरती फुंकर घालण्यासाठी म्हणून आपण इतिहासाचा वापर करू शकतो. हा मुद्दा थोडा विस्ताराने सांगते. अनेकदा गतकाळामध्ये घडलेल्या काही गोष्टीअसतात. कुणी कुणावरती अन्याय केलेले असतात, कुणी कुणाच्या श्रमांची चोरी केलेली असते. कुणी कुणाला मानवी प्रतिष्ठेपासून वंचित ठेवलेलं असतं, या सगळ्या गतकालातील अन्यायांचा जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा आपल्याला असं वाटतं की, अरे-अन्यायांपासून लोकांना वाचवणारी ही एक व्यक्ती होऊन गेली बरं का. तिचा इतिहास कथन केलाच पाहिजे. त्यामुळे आपण आपल्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी उपचारपद्धतीसारखा इतिहासाचा वापर करतो. म्हणजे इतिहासाची तीन कार्ये आपण बघितली. एक बोधात्मक आहे, दुसरं कार्य माहितीपर आहे. आणि तिसरं म्हणजे इतिहासाचा उपचारपद्धती म्हणून वापर असं आहे.

इतिहासाचे असे विविध वापर, कार्ये जेव्हा आपण समजून घ्यायचा प्रयत्न करतो, तेव्हाच आपल्याला गैर पद्धतीने वापर करणं म्हणजे काय हे लक्षात येतं. यासाठी मुद्दाम ही थोडीशी तात्त्विक आणि इतिहासाच्या अभ्यासक्षेत्रासंबंधीची चर्चा केली.

इतिहासाचा वापर कोणत्या उद्दिष्टासाठी केला जातो, त्या उद्दिष्टानुसार तो गैरवापर आहे की वापर आहे हे आपण ठरवू शकतो. याचा अर्थ, आधी आपल्याला कुठल्याही ज्ञानशाखेचं उद्दिष्ट ठरवलं पाहिजे की, या सगळ्या ज्ञानामधून मी पन्नास देशांचा, वीस प्रदेशांचा आणि शंभर व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास केला. तर पुढे याचं फलित काय आहे? तर माझं मत असं आहे की या सगळ्याचं फलित हे असलं पाहिजे की, आपण एका शोषणविरहित समाजाची रचना, निर्मिती या अभ्यासामधून करू शकू. प्रत्येकाचे उद्देश अर्थातच वेगळे असू शकतात. त्यामुळे मी हे अगदी फक्त माझ्यापुरतं म्हणते की, कुठल्याही ज्ञानशाखेच्या अभ्यासाचं आणि तसंच इतिहासाचं शोषणविहीन समाजरचना हे उद्दिष्ट असू शकतं. असा एक समाज जर आपण रचू शकलो, आणि त्याला उपकारक अशी मांडणी जर इतिहासातून होत असेल तर ते माझ्या उद्दिष्टाला पूरक म्हणून योग्य आहे, असं मला वाटतं. ही शोषणविहीन समाजरचना निर्माण करायची आणि त्यासाठी इतिहासाचा अभ्यास करायचा असं आपण म्हटलं, तर इतिहास लोकांच्या समोर कसा मांडावा, हा प्रश्न आपल्यासमोर निर्माण व्हायला लागतो. कारण आपलं उद्दिष्ट शोषणविहीन समाजरचनेचं आहे, पण आपल्याला आपल्या भूतकाळामध्ये दिसतंय की, अनेक ठिकाणी, अनेक प्रसंगी, अनेक पातळ्यांवर, विविध प्रकारे लोकांचं शोषण तर झालेलंआहे. मग आता काय करायचं? शोषण झालंच नव्हतं, असं म्हणून झालेल्या गोष्टी झाकून ठेवायच्या? की असं असं झालं होतं, त्याचा आपण क्षमाशीलतेने स्वीकार केला पाहिजे, पण इथून पुढे आपण हे थांबवलं पाहिजे, अशी शिकवण आपण इतिहासाच्या वाचकांना द्यायची, हा खरा कळीचा प्रश्न असतो. म्हणजे प्रत्येकाला आपापला युटोपिया, एक आदर्श स्वप्नलोक, जेव्हा रचायचा असतो, त्यासाठी प्रत्येकजण आपापल्या इतिहासाच्या कथनाचा वापर करत असतो. त्यामध्ये गैर काय आहे? तर गैर उद्देशाने केलेला इतिहासाचा वापर हा गैरवापर म्हणता येईल. उदाहरणार्थ, असलेल्या विषमता आणखीनच खोल व्हाव्यात, त्या आहेत तशा लोकांनी स्वीकाराव्यात, लोकांना त्या चांगल्याच आहेत, असं वाटावं, अशा हेतूनं कुणी म्हणालं, की "बाई गं, हे इतिहासकाळातले दाखले पहा आणि आजही तू सती जा, उपासतापास करून शरीराची हानी करून घे. आणि त्यामुळेच आपली समाजरचना टिकून राहील." तर असं सांगणं म्हणजे स्त्रियांना समाजात मिळणारी विषमतेची वागणूक आणखी पक्की करणारा इतिहासाचा गैरवापर आहे, असं मी म्हणेन.

मघाशी मी म्हणाले की, प्रत्येकाचं एक आपापल्या इतिहासाचं कथन असतं. या अनुषंगाने मी तुम्हाला एका गोष्टीची आठवण करून देऊ इच्छिते. आपण सगळ्यांनी बहुधा प्राथमिक शाळेमध्येच ही गोष्ट ऐकलेली असते. एक कावळा होता. तो चोचीमध्ये खाण्याचा तुकडा घेऊन झाडाच्या फांदीवर बसलेला होता. खाली कोल्हा आला आणि त्याला म्हणायला लागला की, अरे, तू किती सुंदर गाणं म्हणतोस. मला गाणं म्हणून दाखव की. कावळा फसला. त्याने गाणं म्हणण्यासाठी जेव्हा चोच उघडली, तेव्हा त्याच्या चोचीमधून अन्नाचा तुकडा खाली पडला आणि कोल्हा तो घेऊन पळून गेला. ही एक छोटी गोष्ट आहे. पण एक कथन म्हणून इतिहासाचे अभ्यासक, वाचक म्हणून सजगपणे दुसऱ्याही अंगाने आपण त्याकडे बघू शकतो. जेव्हा मी प्राथमिक शाळेमध्ये होते, तेव्हा या गोष्टीचं नाव होतं, 'चतुर कोल्हा आणि मूर्ख कावळा'. म्हणजे गोष्टीच्या नावापासूनच यामध्ये त्या कावळ्याला दोष दिला होता. त्याने स्तुतीला भुलून जाऊन चोच उघडली आणि आपलं अन्न गमावून बसला. जेव्हा मी इतिहासाचा अभ्यास करायला लागले आणि या सगळ्या कथनाकडे बघायला लागले, तेव्हा मला वाटलं की, मी जर कावळ्याच्या जागी असते, तर मी या गोष्टीला असं नाव दिलं असतं का? निश्चित दिलं नसतं. जर आपल्याला कुणी कुणाची भाकरी पळवून नेणं हे मजेशीर आणि हुशारीचं काम वाटत असेल तर आपल्याला ही गोष्ट 'चतुर कोल्हा आणि मूर्ख कावळा' म्हणून आवडेल. अन्यथा असलेल्या शोषणकारी व्यवस्थेला आणखीन खोलवर रुजवणारी आणि तिची भलावण करणारी अशी गोष्ट म्हणूनही आपण तिच्याकडे बघू शकतो. म्हणजे सांगायचा मुद्दा असा की, तुमचा दृष्टीकोन काय आहे, हे फार महत्त्वाचं असतं. इतिहासाचे अभ्यासक नेहमी अशा द्वंद्वामध्ये सापडत असतात की, कुठल्या गोष्टीच्या बाबतीत आपण कशी भूमिका घ्यायची? मी जर इतिहासकार असेन तर ज्याची भाकरी हिरावली गेली, त्या कावळ्याची बाजू घेणार की, ज्याने हुशारीने स्वतःची भूक भागवण्यासाठी कावळ्याचं अन्न पळवलं त्या कोल्ह्याची बाजू घेणार? लहानपणी अर्थातच गप्प बसा' संस्कृतीमध्ये आपण गोष्टीचं शीर्षक हेच सत्य मानलं. पण आता जेव्हा आपण अधिकाधिक विचार करायला लागतो, तेव्हा असं लक्षात येतं की, आपण दुसऱ्याही बाजूने विचार करणं गरजेचं आहे. आणि नुसता विचार करणं नाही तर जेव्हा अस्तित्त्वात असलेल्या विषमता आणखीनच सखोल व्हाव्यात, त्यांची आणखीनच भलावण व्हावी, यासाठी अशा अनेक कथनांचा वापर केला जातो तेव्हा त्याचा निषेध करणं, त्याच्याविरुद्ध बोलणं, हेसुद्धा अतिशय गरजेचं आहे. पण हे सगळं कळण्यासाठी आपल्याला थोडा-बहुत इतिहास वाचणं, त्याच्याकडे विशिष्ट अशा दृष्टीने बघणं हे गरजेचं असतं असं मला वाटतं. म्हणजे इतक्या छोट्या छोट्या कथनांचादेखील जर का गैरवापर होत असेल, तर इतिहास या गतकालाच्या कथनाचा गैरवापर होतो, हे आपल्याला मान्य केलंच पाहिजे.

इतिहासाचा गैरवापर होतोय का, याचा विचार करायचा म्हटला तर आपल्याला प्रत्येक कथन तपासून पाहणं अतिशय गरजेचं आहे. म्हणजे इथे पुन्हा आपली इतिहासकार म्हणून भूमिका किंवा इतिहासाचे सजग वाचक म्हणून भूमिका ही खूप महत्त्वाची असते. आमच्या इतिहासाच्या क्षेत्रामध्ये कुणी काही गतकाळाविषयी कथन केलं तर ते सहजासहजी मान्य केलं जात नाही. म्हणजे इतिहासलेखनामध्ये नुसता 'कच्चा माल' मिळून चालत नाही. त्याची चिकित्सा करणं आणि त्याला पाच मूलभूत प्रश्न विचारणं अपेक्षित असतं. "हू? व्हेन? व्हॉट? व्हेअर? व्हाय?". म्हणजे सांगणारा कोण आहे, कधी सांगतोय, काय सांगतोय म्हणजेत्याचं कथन नक्की कायआहे, कुठे सांगतोय म्हणजे त्याचं स्थान काय आहे जात, वर्ग, लिंगभाव, प्रादेशिक, ग्रामीण, शहरी इत्यादी सर्व प्रकारची स्थानं यात आली. आणि शेवटचा प्रश्न म्हणजे याच्या सांगण्यामागची प्रेरणा नक्की काय असू शकते? कुठल्याही कथनाच्या संदर्भात आपण जेव्हा या पाचही प्रश्नांचा विचार करतो, तेव्हा निश्चितपणे आपल्याला, ही गोष्ट आपल्यापर्यंत पोहोचते आहे; पण पोहोचवणाऱ्यांचे उद्देश काय आहेत हे कळतं. त्यामुळे इतिहास या ज्ञानशाखेमध्ये आपल्याला एखादी बखर मिळो, एखादं काव्य मिळो, कुणाचा शिलालेख मिळो, एखादं नाणं मिळो, तरी आम्ही लगेचच्या लगेच हे अमुक काळातलं नाणं आहे, अमुक व्यक्तीने लिहिलेलं काव्य आहे यावर विश्वास ठेवत नसतो.

सध्या आपण ज्या काळामध्ये जगतोय, तो माहितीच्या महास्फोटाचा काळ आहे. साध्यासाध्या गोष्टींच्या बाबतीत व्हॉट्सॲप असेल, फेसबुक असेल, आणखी सोशल मीडिया असतील, इंटरनेट असेल, इतक्या प्रकारांनी आपल्याकडे माहिती ही चुकीच्या, सत्याचा अपलाप करणाऱ्या, सत्य झाकून ठेवणाऱ्या, सत्याचा विपर्यास करणाऱ्या

पद्धतीने पोचत असते की, 'हू, व्हेन, व्हॉट, व्हेअर, व्हाय?' एवढे पाच प्रश्न जरी आपण डोक्यामध्ये जागृत ठेवले, तरी आपल्याला त्याचा खूप उपयोग होईल, असं इतिहासाची अभ्यासक म्हणून मला वाटतं. खरं म्हणजे कुठलाही विषय असो, इंजीनिअरिंग, विज्ञान, कॉमर्स, त्या त्या शास्त्राचं तत्त्वज्ञान हेच सांगतं की, कुठल्याही गोष्टीवर दिसताक्षणी चिकित्सेशिवाय विश्वास ठेवू नका.

पण हे बोलतानाच मला 'संशयात्मा विनश्यते।' असं गीतेमध्ये म्हटलंय ते आठवलं. म्हणजे, संशय घेतला तर तुमचा विनाश हा ठरलेला आहे. आजच्या आधुनिक काळात आपण जी चिकित्सा करणं अपेक्षित आहे, त्याच्या बरोबर उलट्या विधानांचा वारसा अशा अनेक पारंपरिक ग्रंथांमधून आपल्याला मिळालाय. प्रश्न असा येतो की, माझ्या आजीची चौघडी आहे, म्हणून मी जितक्या कौतुकाने, प्रेमाने जपून ठेवीन, तसाच हा वैचारिक वारसाही मी कौतुकाने सांभाळत राहावं का? तर तुकारामांच्या रचनेतलं अतिशय उत्तम उदाहरण मला इथे दिसतं. 'आम्हांसी नावडेआमुचे संचित।' जे संचिताचं गाठोडं आमच्या खांद्यावरती तुम्ही दिलेलंआहे, ते आम्हाला आवडत नाही, असं स्पष्ट शब्दांमध्ये ते म्हणून जातात. परंपरा आहे म्हणून पाळलं पाहिजे, त्याला नाही कसं म्हणणार, असा एक पेच असतो. व्यवस्था कितीही त्याला कवटाळून ठेवायला सांगत असेल, तरी जर आधुनिक बनायचं असेल तर नावडत्या वारशाचं काय करायचं हे आपल्याला चार- पाचशे वर्षांपूर्वीच तुकारामांनी सांगितलेलं आहे. जे संचित आपलं झालेलं आहे, मिळालेला जो वारसा आहे, तो आवडत नसेल तर मोकळेपणाने आपण सांगू शकतो की, हे मला आवडत नाही. कुणी कितीही सांगू दे, उपास कर, व्रतं कर,, तुझी जातच श्रेष्ठ आहे किंवा कनिष्ठ आहे, तर ते मला मान्य नाही. त्यामुळे इतिहास ही गोष्ट तारतम्यानेच घेतली पाहिजे, असं माझं इथे कळकळीचं सांगणं आहे. इतिहासामध्ये अनेक गोष्टी घडल्याही असतील. कुणी कुणाचं शोषण केलं, कुणी कुणाला मारलं, आणखी काय विध्वंस केले. पण त्या सगळ्या गोष्टी घेऊन आपण तसंच वागायला हवं का? तीच गोष्ट आपण पुन्हा पुढे करत राहाणार का, चाकोरी आणखी खोल करत जाणार आहोत का, याचा विचार आज २०१७ मध्ये आपण केला नाही, तर आपण एका मूलतत्त्ववादी अशा पद्धतीच्या आयुष्यामध्ये चिणले जाऊ अशी मला भीती वाटते. इतिहासात काही तथ्ये असतात. त्यांचा आपण काही सर्जनशील असा अन्वयार्थ लावत असतो. ही जी तथ्येआहेत, ती कोणीतरी नोंदविलेली असतात. आपण ही महत्त्वाची गोष्ट अनेकदा विसरतो की, इतिहास हा ज्या गोष्टींच्या आधाराने आपण रचतो, त्या गोष्टी या त्या त्या नोंदविणाऱ्याच्या स्मृतिपटलावरती उमटलेले गतकालीन घटनांचे ठसे आहेत, हे लक्षात घेतलं पाहिजे. पिअरे नोरा नावाचा फ्रेंच तत्त्वज्ञ आहे, ज्याने फ्रान्समधल्या स्मृतिस्थळांबद्दल अनेक खंड लिहून प्रसिद्ध केले आहेत. घडून गेलेल्या पण अप्रिय अशा काही गोष्टी आपण इतिहासात मांडायचंच टाळतो. तर दुसरीकडे भूतकाळात घडलेल्या काही गोष्टींची स्मृती अवाच्या सव्वा प्रमाणात जपली जाते. काही गोष्टींची स्मृती फारच तोकड्या स्वरूपात जपली जाते. आणि कधी कधी तर, अगा जे घडलेचि नाही, अशा न घडलेल्या गोष्टींचीही आठवण पद्धतशीरपणे निर्माण करून जतनही केली जाते. या स्मृतींच्या विविध रूपांना नोरा यांनी अनुक्रमे स्मृतिभ्रंश एम्नेझिया, अतिस्मृति हायपरम्नेझिआ, स्मृतिक्षय हायपॉम्नेझिआ आणि कृतकस्मृती म्हणजेच स्यूडोम्नेझिया अशी नावं दिली होती.

आपल्या इतिहास या क्षेत्रातील सगळ्या अभिव्यक्ती त्या स्मृतींवरच आधारलेल्या असतात. त्यामुळे मुळामध्ये नोंदवतानाच एखादी गोष्ट नोंदवली नाही, एखाद्या गोष्टीबद्दल बोललंच नाही, असं होत असतं. ज्या छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकभवनामध्ये आपण आहोत, त्या शाहूमहाराजांनी जातीव्यवस्थेच्या विरोधात अविरत कार्य केले. पण त्या जातिव्यवस्थेपायी अनेक प्रकारांनी लोकांचं शोषण झालेलं आपल्याला दिसतं. अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याबद्दल आपण स्मृतिभ्रंश झाल्यासारखं पूर्णतः मौन बाळगत असतो, आणि खरं तर काही विशेष महत्त्व देण्याच्या योग्यतेच्या नाहीत अशा दुसऱ्याच कुठल्या तरी गोष्टी लोकांच्या मनात कृतक स्मृती निर्माण व्हाव्यात, भ्रम निर्माण करावा, म्हणून आपल्यावर सतत आदळत असतात.. जणू काही तेच खरे आपले राष्ट्रीय प्रश्न आहेत. इतिहासाचा गैरवापर असं आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा या सर्व गोष्टी आपल्याला विचारात घेतल्या पाहिजेत. म्हणजे नुसतं एका व्यक्तीने एक इतिहासाचं पुस्तक लिहिलं आणि त्यामध्ये २५आणि ५०क्रमांकाच्या पानावर अशा दोन चुका आढळल्या,

म्हणजे त्याने इतिहासाचा गैरवापर केला किंवा चुकीचा इतिहास लिहिला इतकी ही सोपीसाधी गोष्ट नसून इतिहासाचा गैरवापर ही एक खोलवर जाणारी मानसिक अशी प्रक्रिया आहे.

आज मी सोबत मार्क फेरो या लेखकाचं 'इतिहासाचा वापर आणि गैरवापर' *(Use and Abuse of History)* हे पुस्तकघेऊन आलेलेआहे. ते१९८१साली पहिल्यांदा प्रकाशित झालं. म्हणजे त्याच्या प्रकाशनाला ३५ वर्षे होऊनगेली. आणि या पुस्तकात भारताच्या संदर्भात एक छोटंसं प्रकरणआहे. सांगायचा मुद्दा असा की, जगाच्या पाठीवर कित्येक देश असे आहेत, खरं सांगायचं झालं तर प्रत्येक समाज असा आहे की, जिथे इतिहास या गोष्टीचा गैरवापर केलेला आपल्याला दिसतो. मग याचा अर्थ असा आहे का की इतिहास या गोष्टीचा गैरवापर होणार हे ठरलेलंच आहे? जसं आपण श्रमिक प्रतिष्ठानचे लोक आहोत. आपण श्रम करून, कष्ट करून इथे उदरनिर्वाह करतो. आणि जगभरामधल्या श्रमिकांशी आपलं नातं जोडतो. तसं भारतात इतिहासाचा असा गैरवापर केला जातोय, असं एका छोट्या प्रकरणात जरी लिहिलेलं असलं, तरी या पुस्तकातील इतर चौदा प्रकरणे वाचून आपल्याला कदाचित थोडासा दिलासा मिळू शकतो की, जगभरामध्ये अनेक ठिकाणी, अनेक असे शोषित-वंचित समाज आहेत, ज्यांचा इतिहास पुसून टाकण्याची किंवा ज्यांच्या इतिहासाची मोडतोड करण्याची प्रथा त्या त्या देशांमध्ये रुजलेली आहे. याचा अर्थ आपण या लढाईत एकटे नाही आहोत. या दृष्टीने मी दोन उदाहरणांचा अभ्यास केला होता. दोन वर्षांपूर्वी 'इतिहासाचे वापर आणि गैरवापर' हा एका परिषदेचा विषय होता. त्यामध्येही हंगेरी, पोलंड, स्विटझर्लंड, नेदरलँड्स अशा वेगवेगळ्या देशांमधून आलेले अभ्यासक त्यांच्या त्यांच्या देशांमध्ये इतिहासाचा कसा गैरवापर केला गेला, अस्तित्त्वात असलेल्या शोषणव्यवस्था आणखीन खोलवर रुजविण्यासाठी इतिहास कसा सांगितला गेला, अशी उदाहरणे घेऊन आले होते. माझ्या शोध निबंधामध्ये मी महाराष्ट्र आणि मराठी भाषेची दोन उदाहरणे उपस्थित लोकांसमोर मांडली.

आपल्या इतिहासविषयक कथनाला वैधता प्राप्त करण्याचं साधन म्हणून इतिहासाचा वापर कसा होतो आणि त्यातून सामाजिक उतरंडीतील संबंधिताचं स्थान कसं प्रस्थापित होतं, हे पहिल्या उदाहरणातून दिसून येईल, असं वाटतं. अभ्यासकांसाठी 'संदर्भ पुस्तक' असल्याचा आभास निर्माण करणारं 'आम्ही चित्पावन' हे पुस्तक २००३ साली प्रकाशित झालं. चित्पावन जातीच्या विविध लेखकांचे ३० लहान लेख यात आहेत. यातील सर्वांत जुना लेख १९१३ सालचा आहे आणि सर्वांत अलीकडचा लेख २००३ साली लिहिलेला आहे. काही धूसर संस्कृत स्रोतांमधून वंशावळीचा दावा या पुस्तकात करण्यात आलेला आहे. ब्रिटिश वासाहतिक प्रशासकांनी चित्पावनांच्या विविध गुणांची दखल घेतल्याची उत्साही जाहिरातही या पुस्तकात आहे. शिवाय, भारतीय सामाजिक रचनेत सर्वोत्तम स्थान चित्पावनांसाठी राखून ठेवत जातिआधारीत दडपशाहीच्या अपराधभावापासून त्यांना मुक्त करणारी अनिर्बंध उदार वृत्ती या पुस्तकात दाखवण्यात आली आहे 'चित्पावन हे निःसंशयपणे भारतातील अतिशय सक्षम वर्गांमधील एक आहेत,' अशी प्रशस्ती १८८५ साली मुंबई प्रांताच्या दर्शनिकेत देण्यात आली हेही त्यात हर्षभराने नोंदवलं आहे. परंतु मी जेव्हा हू व्हेन व्हॉट व्हेअर, व्हाय या प्रश्नांना जागून दर्शनिकेची प्रत वाचली, तेव्हा हे स्पष्ट झालं की तो भागही मुळात नरसो रामचंद्र गोडबोले या चित्पावन हस्तकाने लिहिलेला होता, अशी नोंद दर्शनिकेच्या ऋणनिर्देशातच केलेली आहे! इतिहासाच्या वापर व गैरवापराचा 'नमुना' म्हणून या पुस्तकाचा विचार का करायचा? म्हणजे बाजारात इतर असंख्य पुस्तकं उपलब्ध असताना याचाच अभ्यास कशासाठी?

तर इब्न खाल्दून या इतिहासाच्या तत्त्वचिंतकानं चौदाव्या शतकात दिलेला इशारा इथे नोंदवावासा वाटतो.

'जर एखाद्या विशिष्ट पंथ किंवा विचाराच्या प्रेमापोटी मन कलुषित झालं असेल, तर ते सोयिस्कर तेवढ्या विचारांना चटकन मान्यता देतं. या पूर्वग्रहांमुळे आणि पक्षपातामुळे चिकित्सक बुद्धी आणि विचक्षणपणावर सावट येतं. परिणामी खोटेनाटे दावेच खरे मानून त्यांचा प्रसार केला जातो.

इतिहासाच्या गैरवापराचा 'नमुना' म्हणून 'आम्ही चित्पावन' या पुस्तकाचा विचार करण्याचं पहिलं कारण- हे पुस्तक 'संदर्भा'साठी असल्याचा दावा करण्यात आला आहे. विसाव्या शतकातील बरीच जनमान्यता लाभलेल्या इतिहासकारांचे, बुद्धीजीवींचे व राजकीय नेत्यांचे लेख या पुस्तकात आहेत. वि. का. राजवाडे, चिं. वि. वैद्य आणि लोकमान्य टिळक यांसारख्या मंडळींचा यात समावेश आहे. दुसरं कारण हे पुस्तक 'ट्रोजन हॉर्स' मोहिमेसारखं किंवा

मेंढ्यांची कातडी पांघरून त्यांच्या कळपात शिरलेल्या लांडग्यासारखं आहे. अगदी प्रमाण मराठीत लिहिलेल्या या पुस्तकात उच्चजातीयांशी पारंपरिकरीत्या जोडली गेलेली जातीय आक्रमकता आढळत नाही. त्यामुळे एका समुदायासंबंधीच्या कथनांचं हे निरुपद्रवी संकलन आहे, अशी समजूत होण्याची शक्यता आहे. पण ती गैरसमजूत म्हणावी लागेल. अनिर्बंध उदारमतवादी विचारसरणीप्रमाणे या पुस्तकातही असा दावा केला आहे की, चित्पावनांनी त्यांचं स्थान हक्कानं कमावलेलं आहे. मुळात इतर जातींना कनिष्ठ लेखूनच चित्पावनांना विशेषाधिकार प्राप्त झाले, याविषयी एक शब्दही या पुस्तकात नाही. किंबहुना हे पुस्तक जातीय भेदभावाचं समर्थन करणारं ठरतं, कारण विशेषाधिकारी वागणूक मिळण्यास चित्पावन 'निसर्गतः' पात्र आहेत अशा स्वरूपाची मांडणी त्यात आहे. खरं तर, लढाऊ वंशाचा सिद्धान्त आणि आर्य आक्रमणाचा सिद्धान्त यांसारखी मांडणी पूर्णतः निरर्थक असल्याचं पूर्वीच सिद्ध झालेलं आहे आणि तरीही जातींना त्यांच्या कथित स्वभावधर्मानुसार जोडण्यात आलेल्या मिथ्या-वैज्ञानिक वैशिष्ट्यांचं समर्थनही या पुस्तकात केलेलं आहे.

प्रस्तुत नमुना-अभ्यासासाठी निवडलेलं दुसरं पुस्तक इतिहासाचं नाही आणि त्यामध्ये तसा काही दावाही केलेला नाही. पण त्यात आपली बाजू ठासून मांडण्यासाठी केलेला इतिहासाचा वापर लक्षवेधक आहे. इतिहासलेखनाच्या सबाल्टर्न प्रवाहाचे उद्गाते रणजित गुहा यांनी नमूद केल्याप्रमाणे, 'भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासलेखनावर अभिजनवादाचं वर्चस्व राहिलं आहे- वासाहतिक अभिजनवाद आणि बूर्झ्वा-राष्ट्रवादी अभिजनवाद असे दोन्ही प्रकार त्यात आहेत... भारतीय राष्ट्राची निर्मिती आणि या प्रक्रियेला आधारभूत ठरलेल्या राष्ट्रवादी जाणीवेचा विकास केवळ किंवा मुख्यत्वे अभिजनांमुळे झालेला आहे, असा पूर्वग्रह या दोन्ही प्रकारच्या अभिजनवादांमध्ये आढळतो. इथे अभ्यासलेलं पुस्तक या प्रवाहाविरुद्ध जात अभिजन नसलेल्या लोकांना कर्तेपण (एजन्सी) व आवाज देण्याचा प्रयत्न करतं.

'आम्हीही इतिहास घडवला'' असं या पुस्तकाचं नाव आहे. सामाजिक मुक्तीसाठी डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या चळवळीत सहभागी झालेल्या दलित स्त्रियांच्या मुलाखतींचं संकलन यामध्ये करण्यात आलं आहे. वासाहतिक काळापासून वसाहतोत्तर काळापर्यंत भारताच्या स्थित्यंतरात खरे प्रयत्न गांधी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांनी केले, असं गृहीतक मध्यवर्ती ठेवून आधुनिक भारताचा इतिहास बहुतांशाने लिहिला गेलेला दिसतो. परंतु, दलितांचा या स्थित्यंतराबद्दलचा दृष्टिकोन अतिशय भिन्न आहे. राजकीय सत्ताबदलापेक्षा (१९४७) स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने (१९५०) दिलेले मानवाधिकार व स्वातंत्र्य दलितांना अधिक मौल्यवान वाटतं. स्वातंत्र्यपूर्व काळातील अस्पृश्यतेच्या मानहानीकारक अस्तित्वाला या घटनात्मक अधिकारांनी छेद दिला.

सदर पुस्तकासाठी मुलाखती घेण्यात आलेल्या सर्व स्त्रिया दलित जातींमधील आहेत. डॉ. आंबेडकरांनी लढण्याची प्रेरणा देईपर्यंत या स्त्रिया गरीबीचं व मानहानीचं जीवन जगत होत्या. जातीय भेदभाव ही केवळ सामाजिक समस्या नाही, त्याचे वास्तव जीवनात आर्थिक परिणामही होत असतात. या पुस्तकातील मुक्ता सर्वगौड यांची मुलाखत या संदर्भात उद्बोधक आहे. द्रोण तयार करण्याचं प्रशिक्षण दलित स्त्रियांना देण्यासाठी आपण शेकडो रुपये गुंतवल्याचा अनुभव त्यांनी सांगितला आहे. पण दलित स्त्रियांचा स्पर्श झालेले हे द्रोण कोणीही विकत घेतले नाही, त्यामुळे शेवटी हजारो द्रोण फेकून द्यावे लागले.

त्या एकदा गांधींना जाऊन भेटल्या होत्या. गांधींसोबतचा संवाद त्यांच्याच शब्दांत असाः

मी धिटाईनं गांधीजींना प्रश्न विचारला, "हरिजन सेवक संघाचा फंड हरिजनांच्या ताब्यात का देत नाही?"

गांधीजींनी उत्तर दिलं, "हरिजनांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवण्याचं पाप आम्ही केलं आहे सवर्ण हिंदूंनी केलं. प्रयत्न चालू आहे म्हणून ते त्यांच्याच हातानं धुण्याचा आहे" आर्थिक संधी नाकारली जाते त्यामागे जातीय विषमताही कारणीभूत असते आणि भारतीय राष्ट्रीय चळवळीतील आदर्श नेते अस्पृश्यांवर विश्वास ठेवायला तयार नव्हते, यांसारखी वस्तुस्थिती भारताचा राष्ट्रीय इतिहास सांगणाऱ्या प्रमाणित पुस्तकांमध्ये कधीही अधोरेखित केली जात नाही. इतिहासाविषयी निराळं परिप्रेक्ष्य मांडण्यासाठी 'आम्हीही इतिहास घडवला'सारख्या पुस्तकाने ऐतिहासिक कथनांचा व दाव्यांचा वापर केला, तर त्याला इतिहासाचा वापर म्हणायचं की गैरवापर म्हणायचं? ज्ञानाच्या लोकशाहीकरणाचं

तत्त्व विचारात घेतलं, तर असं म्हणता येईल की, वाचकांना जितकी अधिक ऐतिहासिक कथनं उपलब्ध असतील तितकं भूतकाळाचं आकलन करून घ्यायला श्रेयस्करच ठरेल.

पण ही कहाणी इथेच संपत नाही. या पुस्तकाचं लेखन-संपादन दोन स्त्रियांनी केलं आहे आणि त्या स्वतः दलितच आहेत. आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची विनंती त्यांनी मराठीमधील आघाडीचे (आता दिवंगत) इतिहासकार य. दि. फडके यांना केली. लेखिकाद्वयानं फार कमी महिलांच्या मुलाखती नमुन्यादाखल घेतलेल्या आहेत, त्यामुळे या पुस्तकाची व्याप्ती अतिशय मर्यादित होते, असं मत फडक्यांनी प्रस्तावनेत व्यक्त केलं. आंबेडकरांच्या चळवळीत सहभागी झालेल्या उच्चजातीय महिलांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या नाहीत, आणि दलितांच्या पक्षांसह सर्वच राजकीय पक्षांमध्ये महिलांचं प्रतिनिधित्व अत्यल्प आहे, त्यामुळे अर्थातच या पुस्तकातून आलेली माहिती ही पुरेशी वास्तवदर्शी नाही अशी टिप्पणीही त्यांनी केली आहे. या प्रस्तावनेवर दलित वर्तुळांमधून नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त झली. प्रस्तावनेचे लेखक जन्मानं चित्पावन ब्राह्मण होते, ही जखमेवर मीठ चोळणारी बाब ठरली.

दलित महिलांच्या लिखाणाला एका उच्च-जातीय पुरुषाने ज्ञानाचा दर्जा देणं नाकारल्यामुळे निर्माण झालेला वाद १९९०च्या दशकात मराठी विचारविश्वात संतप्त चर्चाचा विषय ठरला होता. फडक्यांनी घेतलेल्या आक्षेपांचा प्रतिवाद पुढील आवृत्तीमध्ये समाविष्ट करण्यात आला.

इतिहासाच्या वापराचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित करता येईल. 'आम्ही चित्पावन' या पुस्तकामध्ये इतिहासलेखनाच्या व्यावसायिक नियमांचं पालन झालेलं नाही हे उघड आहे. तरीही तो अस्मितानिर्मितीचा प्रयत्न आहे, आणि उच्च वंशावळीवर दावा सांगण्याच्या उद्देशाने हा प्रयत्न झालेला आहे, असं म्हणता येईल. 'आम्हीही इतिहास घडवला' हे पुस्तक डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतील दलित महिलांच्या सहभागाविषयी आहे. हे पुस्तकही व्यावसायिक इतिहासकारांनी लिहिलेलं नाही. ऐतिहासिक माहितीची नोंद करून पर्यायी इतिहास सादर करण्याचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहता येईल. यातून आपण पर्यायी इतिहासाच्या मुद्द्यावर येऊन ठेपतो. आपापल्या स्थानाविषयी वादग्रस्त दावे करणाऱ्या भिन्न सामाजिक स्तरांतील लोकांमधील संघर्षामुळे पर्यायी इतिहासाची निर्मिती अपरिहार्य ठरते. पर्यायी इतिहास म्हणजे गतकाळाचं एक कथन आणि अर्थनिर्णयन असतं, त्यातील तथ्यं व घटनांची मांडणी मुख्यप्रवाही इतिहासाला समांतर तरी असते किंवा त्याच्या पूर्णतः विरोधी तरी असते. भारतातील अस्पृश्यतेचा प्रश्न व जातीय अस्मितांचा अभ्यास करताना पर्यायी इतिहासाच्या निर्मितीची व ग्रहणाची असंख्य उदाहरणं समोर येतात. किंबहुना अनेक अभ्यासकांनी तर असं प्रतिपादन केलं आहे की, एकोणिसाव्या शतकापासून विविध ब्राह्मणेतर जातींमधून पर्यायी संस्कृती उदयाला येऊ लागल्या, त्याचाच परिपाक म्हणून १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी आपल्या अगणित अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला. हिंदू धर्मातील जातीय उतरंडीपासून दूर जाण्यासाठी आणि दूर गेलेल्यांच्या आजच्या अस्मितांमागील रचित परंपरांना पावित्र्यही देण्यासाठीही पर्यायी इतिहासाचा वापर झाला आहे. पर्यायी संस्कृतीच्या निर्मितीसाठी उपयुक्त स्मरणोत्सव आणि घटनांचं व स्थळांचं इतिहासलेखन आजच्या भारतात अतिशय स्पष्टपणे दिसतं." याचं एक उदाहरण असंः मराठी भाषक हिंदू एकमेकांचं स्वागत करताना 'राम राम' म्हणत असत. डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी 'जय भीम' असा पर्यायी शब्दप्रयोग चलनात आणला. 12 राम या हिंदू देवाशी जवळीक ठेवण्याऐवजी त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या नावाशी जोडून घेतलं. आजही आंबेडकरी विचारांच्या अनुयायांमध्ये 'जय भीम' हे स्वागतपर संबोधन लोकप्रिय आहे. अस्पृश्यतेची ओळख पुसून टाकण्यासाठी दलितांनी पारंपरिक पेहराव, अन्न, पेशा व अगदी गावांमधील घरंही सोडून दिली आणि नवीन पर्याय स्वीकारले. या दुरावलेपणाच्या प्रक्रियेचा तर्कसुसंगत परिणाम म्हणून मुख्य प्रवाहातील इतिहास नाकारण्यात आला आणि पर्यायी इतिहासाची निर्मिती झाली.

पर्यायी इतिहासासाठी इतिहासाची निर्मिती, वितरण व ग्रहण करणाऱ्या पर्यायी पद्धतीही गरजेच्या ठरतात. भारतीय समाजातील डीजिटल माध्यमांची पोहोच लक्षणीय वाढली असल्यामुळे इतिहासनिर्मिती व संदेशन यांच्यासाठी नवीन इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांचा वापर होतो आहे. छायाचित्रं, चित्रपट, नभोवाणी, समाजमाध्यमं, ब्लॉग, मायक्रो-ब्लॉगिंग व शॉर्ट टेक्स्ट मेसेज (एसएमएस), विडंबनचित्र व रस्त्याशेजारी सार्वजनिक फलक यांचा वापर इतिहासनिर्मिती व वितरण यांच्यासाठी होतो आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेविषयीचं कोणाचं तरी भाषण स्मार्टफोनवर पाहत-ऐकत

बसलेले विद्यार्थ्यांचे गट विद्यापीठांच्या आवारात सर्रास दिसतात. इतिहासातील कोणत्या ना कोणत्या घटनेविषयी सायबरविश्वात अस्मितेच्या लढाया खेळल्या जात आहेत. पुण्यात २०१४ साली दिवसाढवळ्या एका मुस्लीम तरुणाचा खून झाल्याचा दुःखद उल्लेख ह्यूमन राइट्स वॉचच्या अहवालामध्येही व्यक्त करण्यात आला आहे. हा तरुण सॉफ्टवेअर अभियंता होता आणि एका ऐतिहासिक व्यक्तिमत्वाबद्दल अवमानजनक विडंबनचित्र त्याने समाजमाध्यमांमध्ये प्रसिद्ध केल्याच्या संशयावरून जमावाने त्याची हत्या केली. 'आपल्या'पैकी कोण आहे आणि 'परका' कोण आहे, हे सिद्ध करण्यासाठी इतिहासाचा वापर धोकादायक ठरू शकतो.

आपण जर फक्त आधुनिक भारताच्या इतिहासाचं पुस्तक वाचत राहिलो असतो तर हा जो हरिजनांसाठीचा निधी होता, त्याच्या तिजोरीच्या किल्ल्या कोणाच्या कमरेला होत्या? हा प्रश्न अनुत्तरित राहिला असता. किंबहुना असा प्रश्न आपण विचारूच नये, अशाच पद्धतीने पुस्तकं लिहिली गेली असती. तर हे एक उदाहरण म्हणून मी सांगितलं. अशी अत्यंत महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांची दुसरी बाजू दाखविणारी अनेक कथनं आपल्याला 'आम्हीही इतिहास घडवला' मधून वाचायला मिळतात. 'इतिहासाचा वापर आणि गैरवापर' या दृष्टीने जेव्हा मी या दोन पुस्तकांचा विचार केला, तेव्हा माझ्या लक्षात आलं की दोघाही लेखकांचं उद्दिष्ट तर सारखंच आहे. आमच्या जातीतील, पंथातील, चळवळीतील लोकांनी किंवा आमच्या समविचारी लोकांनी भूतकाळात काय चांगलं केलेलं आहे? त्यांनी इतिहासामध्ये कसं महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे, हे दोन्ही पुस्तके सांगताहेत. मला हे मनातून माहीत होतं की, 'आम्ही चित्पावन' हा इतिहासाचा गैरवापर आहे आणि ऊर्मिला पवारांचं 'आम्हीही इतिहास घडवला' हा इतिहासाचा गैरवापर नाहीये. इथे इतिहासाला उपचार पद्धती म्हणून वापरलंय की, आम्ही काम केलेलं आहे, इतिहास घडवला आहे, पण कोणी तो नोंदवला नाही. म्हणून तो नोंदविण्याची संधी आम्हाला मिळाली आहे, तिचा आम्ही वापर करून घेतोय. पण हे माझ्या मनाने नुसतं सांगून उपयोग नाही. इतिहासाची अभ्यासक म्हणून मला दोन्हीची तुलना करून पाहायला पाहिजे की, हेपण हेच करताहेत आणि तेपण तेच करताहेत की काय? तर मी पुन्हा 'हू, व्हेन, व्हॉट, व्हेअर, व्हाय?' हे प्रश्न विचारले, आणि पिअरे नोराचं फ्रेमवर्क वापरून घडलेल्या गोष्टींच्या स्मृती आपण कशा जतन करतोय, हे समजून घ्यायचा प्रयत्न केला. मला असं जाणवलं की, 'आम्ही चित्पावन सारखं पुस्तकस्वतःच्या जातीचं श्रेष्ठत्व ठसविण्यासाठी लिहिलं गेलेलं कथन आहे. दोन्ही कथनंच आहेत. पण या कथनाचं अंतिम उद्दिष्ट काय आहे? तर मघाशी प्रस्तावनेतील जे वाक्य आपण बघितलं, त्याच्याशी ते संबंधित आहे. आमची चित्पावन जात कशी श्रेष्ठ आहे आणि त्या जातीने अशा श्रेष्ठत्वाच्या आकांक्षा बाळगल्या तर त्यात गैर काही नाही, असं विधान त्या पुस्तकात दीक्षितांनी केलेलं आहे. ऊर्मिला पवारांच्या पुस्तकाचा उद्देश पुस्तकाच्या नावामध्येच सहज समजून येतो. आम्ही इतिहास घडविण्यामध्ये काहीएक योगदान दिलेलं आहे आणि ते नोंदवतोय. मग जेव्हा आपण हा इतिहासाचा वापर आहे की गैरवापर आहे, अशा दृष्टीने बघतो, तेव्हा अंतिम उद्दिष्ट - शोषणमुक्त समाजरचनेसाठी याचा काही उपयोग होतोय की नाही असा विचार करावा लागतो. 'आम्ही इतिहास घडवला' हे त्या कसोटीवर खरं ठरतं हे स्पष्ट होतं आणि मग सगळ्या गोष्टी लख्ख होतात.

त्यामुळे इतिहासाचा वाचक म्हणून, अभ्यासक म्हणून आणि आताच्या भाषेत बोलायचं झालं तर एक विचारी समाजाचा घटक म्हणून जर आपलं तारतम्य जागृत ठेवलं तर सांगणारीव्यक्ती किंवा आपल्याला आलेला व्हॉट्सॲप मेसेज असेल, सीरियल असेल, सिनेमा असेल, पुस्तक असेल; ते इतिहासाचा वापर करतेय की गैरवापर करतेय, हे आपल्याला अगदी सहजपणे समजणं शक्य आहे. शोषणमुक्त समाजरचनेसाठी त्या कथनाचा उपयोग होतोय की या उद्देशाला अपाय होईल असं कथन आपल्यासमोर मांडलं जातंय याचे मूल्यभान ठेवले तर इतिहासातून निव्वळ सत्यापेक्षा अधिक महत्त्वाची अशी समाजधारणेसाठी आवश्यक सामग्री हाती लागू शकते.